# ।। ब्रम्ह ग्यानी को अंग ।।

## मारवाडी + मराठी

सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## अथ ब्रम्ह ग्यानी को अंग लिखंते ।।

।। साखी ।।

**सिवरणरी बेळा किसी ।। क्हा भागण को बार ।।**
**जब चेते सुखराम के ।। तबही लेहे संभार ।।१।।**

परिवाराचे सर्व लोक आपल्या घरात मस्त आहे आणि घराला एकाएकी भयंकर आग लागून गेली आहे आगीच्या घेऱ्यात सर्व लोक पकडले गेले आहेत अशा आगीपासून वाचायचे आहे तर वेळ न गमवता आपल्या घरातून पळायला पाहिजे पळण्याकरीता आता मुहूर्त चांगला आहे का वाईट आहे हे जाणण्यात पळण्यास वेळ नाही केला पाहिजे.वेळ उशीर केला तर मरण निश्चित आहे.अशाचप्रकारे काळ जीवाला ४३,२०,००० वर्षाचे ८४००००० योनीच्या दु:खात ढकलण्याकरीता जबर तयारीत आहे आणि त्याची ही भयंकर तयारी जीवाच्या लक्षात येऊन गेली आहे यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज हंसाला सांगतात की अशी काळाची कपट चाल समजमध्ये आल्यावर हंसाने जागृत होण्यास उशिर नाही केला पाहिजे म्हणजे जो परमात्मा अशा जुलमी काळापासून मुक्त करु शकतो त्याचे स्मरण करण्यात थोडाही उशिर नको केला पाहिजे.।।१।।

**करसी सोई भुक्तसी ।। प्राणी पून अर पाप ।।**
**सुणज्यो सब सुखराम के ।। क्हा बेटो क्हा बाप ।।२।।**

जसे घरात वडिल,मुलगा,आई,बहिण,पत्नी राहत होते.घराला भयंकर जीवघेणी आग लागून गेली अशा आगीतून घरातील काही सदस्य पळून गेले आणि काही पळण्या करीता समर्थ असतांनाही घरातील वस्तूंशी मोह असल्याकारणाने पळू शकले नाही याचा परिणाम हा झाला की जो पळाला तो आगीच्या(ज्वाळेतून)वाचला आणि घेऊन गेला जो पळाला नाही तो आगीत जळून खाक होऊन गेला.जसे पिता पळाले तर पिता वाचले आणि पुत्र पळाला तर पुत्र वाचला परंतु जो पळाला नाही तो पिता असो किंवा पुत्र असो आगीने त्याची राख करुन दिली.अशाचप्रकारे जे पिता किंवा पुत्र पुण्य म्हणजे सतस्वरुपाच्या भक्ती मध्ये वेळ न करता लागून गेले ते काळापासून वाचले आणि महासुखात चालले गेले जे पिता किंवा पुत्र पाप म्हणजे गर्भात टाकणाऱ्या मायेच्या सुखांमध्ये रमून राहिले ते काळाचे ८४००००० योनीचे ४३,२०,००० वर्षाच्या चक्रात अडकून राहिले आणि जन्म मरणाचे महादु:ख भोगत राहीले असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जीव प्राण्यांना समजावून राहीले आहे. ।।२।।

**जिण की म्हेमा जुग मे ।। तांरी उतरी होय ।।**
**ईत ऊत मे सुखराम के ।। फेर फार नही कोय ।।३।।**

जसे जो सदस्य भयंकर आगीपासून वाचून निघून आला त्याची जगात मनुष्य चतुर आहे,

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

हुशार आहे,मृत्यूने घेरल्यानंतरही निघून गेला अशी जेथे तेथे महिमा करुन राहीले आणि जो आग लागल्यावरही घरालाच पकडून बसले आणि आगीमुळे राख होऊन गेले त्याची जगाचे मनुष्य मुर्ख आहे,भोळे आहे,आगीत मृत्यू येईल हे समजल्या नंतरही निघाले नाही अशी अपकिर्ती करुन राहीले आहे.अशाचप्रकारे जो सतस्वरुपाची भक्ती करुन काळाच्या पलिकडे म्हणजे अमरलोकात जातो त्याची ३ लोक चौदा भवन तसेच अमरलोकाचे सर्व लोक महिमा करतात आणि जो प्राणी मनुष्य देह मिळाल्या वरही सतस्वरुप त्यागून मायेतच भिनला राहतो काळाच्या पलिकडे निघत नाही यमाच्या दरबारात बांधला जातो आणि ८४००००० प्रकारच्या गर्भात वारंवार पडतो प्रत्येक योनी बेहाल दु:ख भोगत राहतो अशा प्राण्याची तीन लोक चौदा भवन तसेच अमरलोकात सर्व अपकिर्ती करतात अशा प्रकारच्या किर्ती आणि अपकिर्तीत जराही फेरफार होत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हज्ञानी तसेच सर्व प्राणी मात्रांना समजावत आहे.।।३।।

**अेक कहुँ तोई झूट हे ।। दो भी कहया न जाय ।।**
**ग्यानी सो सुखराम के ।। स्मज लेवो मन माँय ।।४।।**




आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानींना सांगतात की,एक ब्रम्ह सांगू तर खोटे आहे म्हणजे एक ब्रम्ह सांगणे हे बरोबर नाही आणि माया आणि ब्रम्ह असे सांगू तर ब्रम्ह आणि माया असे दोन सांगणे हे पण खोटे आहे ब्रम्ह एक कसे आहे आणि ब्रम्ह आणि माया हे दोन कसे आहे हे ब्रम्हज्ञान आल्यावर म्हणजे सतविज्ञान ज्ञान आल्यावर विज्ञान ज्ञानाच्या अनुभवाने सहज समजते परंतु विज्ञान प्रगट होत नाही तोपर्यंत ज्ञानानेच मनात समजून घ्यावे लागते.।।४।।

**निरवृत्त मे ब्रम्ह एक हे ।। प्रवत मे सुण दोय ।।**
**सत्त जाण्यो सुखराम के ।। जिण घाटे ज्यूं होय ।।५।।**

प्राण्याच्या घटात कुद्रती विज्ञान वैराग्य प्रगट होण्याच्या आधी म्हणजे प्रवृत्त स्थितीत म्हणजे माया स्थितीत प्राण्याला माया सत(सत्य)वाटते आणि सोबत ब्रम्ह(सतस्वरुप ब्रम्ह)ही सत्य वाटतो असे माया आणि ब्रम्ह(सतस्वरुप ब्रम्ह)दोन्ही ही सत्य वाटतात परंतु निवृत्त म्हणजे मायेच्या पलिकडे कुद्रत विज्ञान वैराग्य प्रगट झाल्यावर माया सरासर असत्य आहे आणि काळाचा चारा आहे,सदासुख देणारी नाही आहे असे सदासुख न देणारी खोटी दिसते आणि ब्रम्ह(सतस्वरुप ब्रम्ह)हे अमर आहे काळाच्या पलिकडे आहे,सदा महासुख देणारा आहे कधी ही दु:ख न देणारा आहे असा सत्य आहे असा दिसतो अशाप्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो

प्राणी मायेत आहे त्याला माया सत्य वाटते म्हणून मायेच्या ज्ञानीला माया व ब्रम्ह दोन आहेत असे भासतात आणि जे प्राणी ब्रम्ह(सतस्वरुप ब्रम्ह)बनून गेले आहे त्याला माया खोटी दिसते आणि फक्त ब्रम्हच(सतस्वरुप ब्रम्ह)सत्य आहे हे दिसते.।।५।।

**अनेका मे अेक हे ।। अेके माहे अनेक ।।**
**ब्रम्ह चीन्या सुखराम के ।। ज्यां सब घट मे देख ।।६।।**

अनेकात एक आहे म्हणजे(होणकाळ)पारब्रम्ह,त्रिगुणी माया,सर्व प्राणी तसेच तीन लोक चौदा भवनात एकमात्र ब्रम्ह(सतस्वरुप ब्रम्ह)च आहे आणि हे सर्व म्हणजे(होणकाळ), त्रिगुणी माया,ब्रम्हा,विष्णू,महादेव सर्व प्राणी तसेच तीन लोक चौदा भवन त्या एक ब्रम्ह (सतस्वरुप ब्रम्ह)मध्येच आहे अशा प्राण्याला(सतस्वरुप ब्रम्ह)ब्रम्ह शोधल्यावर म्हणजे प्रगट केल्यावर आपल्या घटातच दिसतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।६।।

**तीन लोक चवदा भवण ।। सप्त दीप नर लोय ।।**
**सब ही सुखराम के ।। अेक घट मध होय ।।७।।**

तीन लोक(स्वर्ग,मृत्यु,पाताळ)चौदा भवन(भुर,भुवर,स्वर,महर,जन,तप,सत,तळ,अतळ, वितळ,सुतळ,तळातळ,रसातळ,महातळ,पाताळ)सातद्विप(जंबु,पुलस्त,शालमली,कुस, क्रोंच,शाक,पुष्कर)हे सर्व एका घटातच आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ब्रम्हज्ञानींना सांगत आहे.।।७।।

**बाहेर नर केबत करे ।। मर्जादा सब खोय ।।**
**ज्यारे सूण सुखराम के ।। कुछ अबलखा होय ।।८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जो मनुष्य स्वतःला ब्रम्हज्ञानी समजतो आणि तो ब्रम्हज्ञानी ब्रम्हला मुर्ती देऊळ,काशी,सप्तपुरी,चारधाम,अडूसष्ट तीर्थ,मक्का मदीनात पाहण्यास सांगतो अशा मनुष्याने म्हणजे अशा ब्रम्हज्ञानीने ब्रम्हची मर्यादा तोडून दिली आहे अशा मनुष्याची मायेची अभिलाषा म्हणजे मायेच्या सुखांची इच्छा आहे असे जाणा. ।।८।।

**ब्रम्ह ग्यान जब ऊपना ।। तब सारा घट माय ।।**
**न्यारो कुण सुखराम के ।। तिण संग जीम ना जाय ।।९।।**

ब्रम्हज्ञान(पारब्रम्ह)जेव्हा प्रगटते तेव्हा सर्व घट ब्रम्हमध्ये दिसतात आणि सर्व घटांमध्ये (पारब्रम्ह)ब्रम्ह दिसतो.ब्रम्हपेक्षा वेगळी अशी पापरुपी आणि पुण्यरुपी माया ही दिसत नाही आणि तुम्ही इतर मनुष्यासोबत त्यांना ब्रम्हपासून वेगळा आहे,पापी आहे हे समजून भोजन करत नाही आणि स्वतःला ब्रम्हज्ञानी(होणकाळ पारब्रम्ह)म्हणतात तर तुमचे हे ब्रम्हज्ञान ब्रम्हज्ञान कसे आहे?हे तर पाप-पुण्याने भरलेले धर्मज्ञान आहे हे ब्रम्हज्ञान

नाही आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज स्वयम् कथीत ब्रम्हज्ञानीला सांगत आहे.।।९।।

चौपाई ।।

**ध्रम ग्यान कन ब्रम्ह ग्यान हे ।। सो तेरा कहे मोई ।।**

**के सुखराम समझ कर बोले ।। मे बुजत हूं तोई ।।१०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तथाकथीत ज्ञानी मनुष्याला विचारले की,तुझे धर्मज्ञान आहे का ब्रम्हज्ञान आहे मला ज्ञानाने समजावून सांगा. ।।१०।।

**ब्रम्ह ग्यान हे सुणो हमारे ।। ध्रम ग्यान नही राखूँ ।।**

**के सुखराम सुणो सब कोई ।। सत बेण अे भाखूँ ।।११।।**

ब्रम्हज्ञानी उत्तर न देता आपल्या खोट्या ज्ञानाला बंद ठेवत आपले काय ब्रम्हज्ञान आहे ते सांगा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना विचारतो आहे तेव्हा आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी त्या मनुष्याला आपले ब्रम्हज्ञान ऐकवितांना सांगितले की,मी तुझ्या सारखे पाप-पुण्याने भरलेले धर्मज्ञान ठेवत नाही मला सर्वात ब्रम्ह दिसतो आणि मला सर्व ब्रम्हमध्ये दिसतात मला कोणी ब्रम्हपेक्षा वेगळी अशी उंच-निच माया दिसत नाही. अशाप्रकारे मला जे दिसते ते तुला सत्य-सत्य सांगितले आहे याच्यात थोडे ही खोटे नाही म्हणजे जे सत्य दिसले आहे तेच वचन तुला ऐकवले असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वयम कथीत ब्रम्हज्ञानीला सांगितले.।।११।।

**ब्रम्ह ग्यान के गुरू न चेला ।। पाप पुन्न कुछ नाही ।।**

**के सुखराम आप मे सब हे ।। आप सकळ के माही ।।१२।।**

माझ्या ब्रम्हज्ञानात(पारब्रम्ह)गुरु कोण तसेच शिष्य कोण हे वेगवेगळे दिसत नाही मला पाप आणि पुण्य असे मायेच्या ज्ञानीं सारखे दोन भाव राहत नाही मला गुरुतही ब्रम्ह दिसतो आणि शिष्यातही ब्रम्ह दिसतो,पापात ही ब्रम्ह दिसतो आणि पुण्यात ही ब्रम्ह दिसतो अशाप्रकारे सर्वांमध्ये एकमात्र ब्रम्ह दिसतो आणि सर्व त्या एकमात्र ब्रम्हमध्ये दिसतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वयम् कथीत ब्रम्हज्ञानी मनुष्याला सांगितले.।।१२।।

**ध्रम ग्यान मेरा सुण सत्त हे ।। सुभ बात सुभ खाणा ।।**

**के सुखराम निच की संगत ।। ऊँच कदे नही जाणा ।।१३।।**

धर्मज्ञान माझ्याजवळ आहे.माझे धर्मज्ञान सत्य आहे माझ्या धर्मज्ञानात शुभ-शुभ करणे म्हणजे केवली संतांची सेवा करणे कैवल्य सतसंग करणे,दु:खीत,पिडीत,कष्टी जीवांना काळाच्या कष्टातून काढणे,सात्विक भोजन करणे अशा गोष्टी आहेत. पशुपक्षांवर दया करणे,त्यांना मारुन त्यांचे भोजन करु नये,जे लोक निच कर्म करतात

त्यांच्या सोबत राहू नये असे माझे धर्मज्ञान आहे उंच आचार करणाऱ्याने निचकर्मी प्राण्यांच्या सोबत कधी जाऊ नये त्यांच्यापासून दूर राहावे असे माझे धर्मज्ञान आहे. ।।१३।।

**सतग्यान के भ्रम न सांसो ।। सत बेण सब बोले ।।**
**के सुखराम रात दिन बीच ।। इसो साच नित तोले ।।१४।।**

माझ्या जवळ सतज्ञान आहे ते सतज्ञान आल्यावर कोणताही भ्रम आणि शंका राहत नाही असे माझे सतज्ञान आहे मी खरे बोलतो माया कशी खोटी आहे आणि सतस्वरुप ब्रम्ह कसा सत्य आहे हे मी जग जसे रात्रंदिवसाच्या फरकाला तोलतात तसे नेहमी तोलतो. ।।१४।।

**सतग्यान जहां न नो न लावे ।। देहे बिके ज्याँ ताँई ।।**
**के सुखराम जत्त तो बाँको ।। बिंद रहे घट माँई ।।१५।।**

संसारात सतज्ञान आहे त्या सतज्ञानात मागणाऱ्याला सतज्ञानी कोणतीही वस्तु देण्यास नाही म्हणत नाही तो आपले शरीर विकून देतो तोपर्यंत तो सत्त राखतो उदा.राजा हरिचंद्र तसा तु आहेस का?जगात जती असतात उदा.हनुमान,कार्तिक स्वामी,गोरखनाथ, लक्ष्मण ज्यांनी ब्रम्हचर्य पाळले होते तसा तु आहेस का? ।।१५।।

साखी ।।

**जिण कण सूं तर ऊपनो ।। सो फळ डाळा मांय ।।**
**सुणज्यो सब सुखराम के ।। जड़ खोज्याँ क्या खाय ।।१६।।**

तेव्हा त्या मनुष्याने सांगितले माझ्यात काय आहे हे काय विचारतात?मी जे करत आहे त्याचे जड म्हणजे बिजाला पहा तेव्हा आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले त्या मनुष्याला तसेच जगाला त्या मनुष्याच्या विधानाला उत्तर दिले की, झाडाचे मूळ म्हणजे बीजात गेल्याने काय वेगळे प्राप्त कराल?जसे बी पेरले ते बीज नाही राहीले त्याला म्हणजे बीज शोधल्याने पोट भरणार नाही कारण की,बीजापासून रोप बनले,रोपाला फांद्या आल्या फाद्यांना फळ लागले आणि फळात बीज आले ते खाल तर पोट भरेल म्हणून ज्या बीजाला पेरले त्या बीजाला शोधल्याने कार्य होणार नाही.।।१६।।

**अंछया कण ध्रम पेड हे ।। डाळा बायक होय ।।**
**लिव छंव्रा सुखराम के ।। ताँ मध वो फळ जोय ।।१७।।**

अरे मनुष्य बीजाची गोष्ट करुन राहीला आहे,सृष्टीत ज्ञानाचे बीज ही दोन प्रकारचे असतात एक बीज इच्छेचा आहे.इच्छेचे आहे म्हणजे मायेचे आहे.या मायेच्या बीजाने मायेच्या धर्माचे रोप लागते या धर्म रोपाला मायेचे मंत्र,यंत्र लागतात जग या मंत्राने

लीव लावून मायेच्या फळाची आशा ठेवतो आणि फळ फळताच त्याचे सुख भोगतो. ।।१७।।

हर कण ब्रम्ह पेड हे ।। डाळा सब संसार ।।
हरीजन सो सुखराम के ।। छँवरा फूल बिचार ।।१८।।

दुसरे बीज सतस्वरुपाचे आहे सतस्वरुप बीजाने कर्तार ब्रम्हाचे झाड लागते ज्याच्यात संसाररुपी जीवाच्या फांद्या उपजतात(निपजतात)या फांद्यामधून केवली संत निपजतात ज्यांचे ज्ञान धारण केल्याने जगाचे लोक अमरलोकाचे महासुख घेतात. ।।१८।।

संगत बिना तिरीयो नही ।। ना सुधऱ्यो जग माय ।।
डूबे सोई सुखराम के ।। कू संगत पे जाय ।।१९।।

सतसंगत शिवाय आजपर्यंत कोणीही भवसागरातून तिरले नाही.म्हणजे आजपर्यंत कोणाचाही जन्म सुधरला नाही.म्हणजेच सतसंगतच्या ऐवजी कुसंगत केल्याने जीव आजपर्यंत बुड्लाच आहे कोणी तिरला नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात दुसऱ्या शब्दात सतस्वरुपाची संगत कराल तर अमरलोकात जाल आणि महासुख लुटाल परंतु कुसंगत कराल म्हणजे खोट्या ब्रम्हज्ञानीची संगत करुन निचकर्म कराल म्हणजे मास,मासे खाल,अमल तंबाखु खाल,हलके कर्म कराल तर बुडाल, नरकात पडाल आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे मनुष्य तुम्हास सांगतात की,तुम्ही ब्रम्ह आहात.ब्रम्हला कर्म लागत नाही म्हणजे तुम्ही कोणतेही कर्म केले भले ते उच्च असो वा निच असो ते कर्म ब्रम्हला लागत नाही त्याचे हे सांगणे असली ब्रम्हज्ञानाच्या अनुसार सत्य आहे म्हणजे हे कर्म हंस ब्रम्हज्ञानी आहे तर लागत नाही परंतु हंस ब्रम्हज्ञानी नाही,त्याला विष आणि अमृत प्यायला दिल्यावर विष ही ब्रम्ह आहे आणि अमृत ही ब्रम्ह आहे हे नाही भासत त्याला विषाने मनुष्य मरतो आणि अमृताने मनुष्य अमर होतो हे भासते तर भले तो उंच कर्म करो किंवा निच कर्म करेल त्याला भोगावेच लागते म्हणजे मायावी मनुष्य ब्रम्हज्ञानीच्या नावावर निच कर्म करेल तर त्याला नरकात जावेच लागते याच्यात काही बदल होणार नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.।।१९।।

जे साहेब सूं झगडीया ।। आठ पोहोर दिन रात ।।
ज्यां पाई सुखराम के ।। आदु घर की बात ।।२०।।

जो साहेबाशी रात्रं-दिवस अष्टोप्रहर साहेबाचे आदिघर प्राप्त करण्याकरीता भांड्तो आहे त्यालाच साहेबाचे आदिघर मिळते म्हणजे जो साहेबाचे स्मरण रात्रं-दिवस करतो त्यालाच साहेबाचा महासुखाचा देश मिळतो.।।२०।।

बिन झगड्या सुळझे नही ।। सेन सेन सूं आय ।।

जे सुळझे सुखराम के ।। धोका रेहे मन माय ।।२१।।

साहेबाशी भांड्ल्याशिवाय म्हणजे साहेबाचे स्मरण केल्या शिवाय साहेबाचे आदिघर मिळून गेले असे समजल्याने साहेबाचे आदघर कधीही मिळत नाही अशा साधकाच्या मनात पुढे धोका आहे हे समजत राहते.।।२१।।

झगडे लागा राम सूं ।। तब बिसऱ्या सब केण ।।
मे ते मन सुखराम के ।। बोल सके नही बेण ।।२२।।

जेव्हा परमात्म्याशी भांडायला लागतो म्हणजे लिव लावून त्याचे स्मरण करतो,साहेबात मग्न होऊन जातो तेव्हा त्याच्यात मनातून उपजणारी मी तू च्या गोष्टी येतच नाही. यामुळे तो ब्रम्हज्ञानी जगातील ज्ञान्यांसारखे मी-तू च्या गोष्टी विसरुन जातो,बोलू शकत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२२।।

तीन लोक का भोमीया ।। साध सिष्ट मे होय ।।
याँ सूं सुण सुखराम के ।। अर्थ छिप्यो नही कोय ।।२३।।

असे पोहचलेले साधु साईच्या सृष्टीचे भोम्या म्हणजे हिस्सेदार असतात जसे परमात्म्याला सृष्टीचे प्रत्येक रहस्य माहित असते तसेच पोहचलेल्या साधुला सृष्टीचे प्रत्येक रहस्य माहित असते.अशा साधुला जगाचे अन्य साधु आदिघरी पोहचले किंवा नाही म्हणजे महासुखाचे मालक बनले किंवा नाही हा अर्थ लपलेला राहत नाही. ।।२३।।

जाँ दिन लागे नाँव सूं ।। सो मन बुध रेवे माय ।।
तो प्रगटे सुखराम के ।। अठ सिध नौ निध आय ।।२४।।

ज्या दिवशी या नामाशी लागले आहात त्या दिवशी जशी बुध्दी आणि मन होते तशीच्या तशी बुध्दी आणि मन प्रत्येक वेळी राहील्यावर अष्ट सिध्दी आणि नऊ निधी प्रगट होण्यात कसर राहत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२४।।

साच बिना ऊधरे नही ।। पच पच मऱ्यो अनेक ।।
पण बिण सुण सुखराम के ।। कण नही आवे देख ।।२५।।

साईच्या विश्वासा शिवाय कोणाचाही उध्दार होत नाही साईवर विश्वास न ठेवता मायेमध्ये विश्वास ठेवून पचून-पचून अनेक मरुन गेले परंतु एक ही उद्धरला नाही आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात ब्रम्ह प्राप्त करण्याच्या दृढ निश्चया शिवाय कण म्हणजे ब्रम्ह पाहू शकत नाही.।।२५।।

क्हे ब्होता सिखे घणा ।। साख शब्द कूं आण ।।
ब्रम्ह भ्यासे सुखराम के ।। सो जन बिर्ळा जाण ।।२६।।

जगात साईच्या देशाला सांगणारे खुप आहेत साईच्या आदिघरच्या संतांनी सांगितलेले

साखशब्द शिकणारे ही खुप आहेत परंतु ज्याला सतस्वरुप ब्रम्ह प्राप्त झाले आहे असा संत विरला आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२६।।

**साख शब्द कूं सीख के ।। ब्रम्ह बतावे आय ।।**
**जाँरे सुण सुखराम के ।। फेर जाळ फिर जाय ।।२७।।**

कोणी आधीच्या संतांची सांगितलेली साखी शब्द शिकून दुसऱ्यांना सतस्वरुप ब्रम्ह सांगतात असे ज्ञानी वेळेनुसार सतस्वरुप विसरुन जातात आणि विसरुन गेल्यावर मायेलाच सत्य म्हणत राहतात आणि मायेची ही भारी महिमा करत राहतात अशा साधका मध्ये हर प्रगटला नाही हे समजले पाहिजे.।।२७।।

**साख सब्द बिण आगला ।। निर्णा करे अनेक ।।**
**ज्याँ हर कूं सुखराम के ।। सें जा लीया देख ।।२८।।**


जे साधक इतर केवली संतांच्या साख्या आणि शब्दाशिवाय वेग-वेगळ्या आनंदपदाचे आणि मायेचे निर्णय करतो आहे त्यांनीच हरला सहजमध्ये पाहिले आहे तसेच अखंडीत पाहून राहिले आहे असे जाणा. ।।२८।।

**ग्यान आगलो सांभळयो ।। मगन हुवो मन माय ।।**
**ज्यां सुणियो सुखराम के ।। हर पायो हे नाय ।।२९।।**

ज्यांनी पहिल्या दुसऱ्यांचे सांगितलेले ज्ञान ऐकून आणि शिकून मनात मग्न होऊन गेले आहे तर त्यांना रामजी मिळाले नाही हे सर्व लोक ऐकून घ्या असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले.।।२९।।

**ग्यान सुण्याँ चेते नही ।। सो बेहरा नर होय ।।**
**आंधा सो सुखराम के ।। जन से निवे न कोय ।।३०।।**

कैवल्य ज्ञान ऐकले आणि चेतला नाही तर समझा तो जीव बहिरा आहे उदा.जसे संसारात बहिऱ्याला आवाज ऐकू येत नाही भले कितीही द्या कारण त्याचे आवाज ऐकण्याचे इंद्रिय मृतक राहतात तसेच ने:अक्षरचे आवाज म्हणजे ने:अक्षरचे ज्ञान ऐकल्यावर चेतत नाही तर समजावे त्याचे सतस्वरुपाचे ज्ञान ऐकण्याचे कान मृतक आहे केवल्य संताला पाहिले आणि त्या संताला नमन नाही केले म्हणजे त्या जनाचे ज्ञान धारण नाही केले तर तो जीव आंधळा आहे.त्या जीवाला सतस्वरुप ओळखण्याचे डोळे नाही आहे.।।३०।।




**त्रुगटी लग तो हद हे ।। आगे बेहद जाण ।।**
**दोनू संध सुखराम के ।। नेणा मध बखाण ।।३१।।**

त्रिगुटीपर्यंत हद आहे आणि त्रिगुटीच्या पलिकडे बेहद आहे त्या हद आणि बेहदचा जोड डोळ्यांच्या मधल्या

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

भागात आहे.।।३१।।

**हद मे फिरे सो मानवी ।। बेहद हरीजन जाय ।।**
**दोनू सिर सुखराम के ।। सो तो ब्रम्ह कहाय ।।३२।।**


जे हदपर्यंत पोहचतात ते काळाच्या मुखात ३ लोक १४ भवनात राहणाऱ्या जगाच्या बरोबरीचे मनुष्य असतात आणि जे बेहदपर्यंत पोहचतात ते काळाच्या पलिकडील रामजीच्या देशाचे हरीजन आहेत आणि जो हद बेहदच्या सांध्यावर पोहचतात ते मायेच्या पलिकडे ब्रम्हमध्ये पोहचलेले परंतु काही काळानंतर गर्भात येणारे ब्रम्ह आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३२।।

**हद बेहद नर क्हेत हे ।। मरम न जाणे कोय ।।**
**हम जाणी सुखराम के ।। रहा संध पर सोय ।।३३।।**

स्वयंम कथीत ब्रम्हज्ञानी मनुष्य हद आणि बेहद सांगतो परंतु हद काय आहे आणि बेहद काय आहे माया काय आहे,ब्रम्ह काय आहे आणि माया ब्रम्हच्या पलिकडील सतस्वरुप काय आहे हे मर्म जाणत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हे मर्म मी हद म्हणजे त्रिगुटी पोहचून,ब्रम्ह म्हणजे हद आणि बेहदच्या सांध्यावर पोहचून आणि हद तथा बेहदच्या सांध्याच्या पलिकडे बेहद पोहचून हा मनुष्य जो ब्रम्ह सांगत आहे तो ब्रम्ह काय आहे हे सांध्यावर अनुभव घेऊन बघितले आहे.।।३३।।

**पायो पायो कहत हे ।। कीयो कुछ नही जाय ।।**
**तब लग सुण सुखराम के ।। किस बिध मानूँ आय ।।३४।।**

याकरीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील लोकांना सांगतात हे स्वंयम घोषित ब्रम्हज्ञानी मनुष्य प्राप्त केला प्राप्त केला,मी ब्रम्ह प्राप्त केला असे सांगतात परंतु ब्रम्हज्ञानी सारखा चालत नाही मग याला ब्रम्हज्ञानी कसे मानू?याला तर जागो–जागी माया म्हणजे मी तू दिसून राहीले.।।३४।।




**में हरीजन मे ग्रक हूँ ।। जुग जन मेरे माय ।।**
**अब न्यारो सुखराम के ।। केणे कूं कुछ नाय ।।३५।।**

हरिजन होऊन गेल्यावर हरिजनाला मी सर्वात ओतप्रोत आहे तसेच सर्व हरिजन माझ्यात आहे,असे ज्ञान होते.हरिजनाला हर शिवाय वेगळे काही दिसत नाही तर सांगण्याकरीता वेगळे काय राहीले? ।।३५।।

**आठ सिध्ध नौ निध प्रगटी ।। साँसो रेयो माय ।।**
**तिण नर सुण सुखराम के ।। हर पायो हे नाय ।।३६।।**

अष्टसिध्दी तसेच नवविधी प्रगटली म्हणतात परंतु मनात संशय आहे की,मी काळाच्या मुखातून सुटेल की नाही तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात अशा मनुष्याला

हर मिळाला नाही. ।।३६।।

साँसो दुबध्या ऊठगी ।। भै भ्रम दीया खोय ।।
वे तो सुण सुखराम के ।। जन हर अेकी होय ।।३७।।

संशय आणि दुविधा मिटून गेली तसेच काळाचे भय मिटून गेले,मायेला सोडले आहे तर सुखांमध्ये कसर पडेल हा भ्रम मिटून गेला परंतु दृढ विश्वास हा होऊन जातो की आता नेहमी करीता सुख मिळेल अशी स्थिती जेव्हा संताची बनते तेव्हा तो संत आणि हर म्हणजे रामजी यांच्यात फरक होत नाही ते दोघे एक असतात. ।।३।।

माहे लागा ख्याल सूं ।। सो निर्गुण पद जाण ।।
बाहेर सुण सुखराम के ।। सुरगुण नांव बखाण ।।३८।।

जे संत शरीराच्या आत विज्ञानाशी लागले आहेत ते निर्गुण पद म्हणजे आनंदपदाचे भावी वासी आहेत हे जाणावे.तसेच जे मनुष्य बाहेरच्या भक्तीत लागले आहे ते सगुण नामाशी लागले आहे असे समजावे यांची पोहच मायेतच आहे सतस्वरुपात नाही असे जाणावे. ।।३८।।

भ्यास्यां का अे नाण अे ।। भ्रम न ऊठे कोय ।।
पायाँ तो सुखराम के ।। मेहे बूठाँ धर जोय ।।३९।।

ज्याला रामजी प्राप्त झाले आहे त्यांच्या मनात मला रामजी म्हणजे हर मिळाला किंवा नाही मिळाला हा भ्रम राहत नाही.ज्याला हर मिळाला आहे त्याला जसे पावसाळ्यात जमीन भिजून जाते ती जगाच्या कोणत्या प्राण्यापासून लपत नाही असेच रामजी प्राप्त झालेला हरिजन जगात लपत नाही. ।।३९।।

भ्यास्यां बिन बाणी नही ।। बिन पायाँ नही नूर ।।
निपज्याँ बिन सुखराम के ।। नही हे राम हजूर ।।४०।।

ज्याला हर म्हणजे रामजी म्हणजे परमात्मा प्राप्त झाला नाही अशा संतांची परमात्मा प्रगट झाल्याची वाणी राहत नाही मायेची वाणी राहते अशा संताच्या मुखावर हर प्राप्त केल्याचे तेज राहत नाही घटात हर म्हणजे रामजी प्रगट न झाल्याकारणाने असे मनुष्य रामजी बेमुख राहतात आणि मायेच्या सन्मुख राहतात. ।।४०।।

पेलो पर्चो ग्यान हे ।। दूजो अणभे जाण ।।
तीजो सुण सुखराम के ।। हंस चेहटे आण ।।४१।।

ज्यांच्यात रामजी प्रगट झाले त्यांचा पहिला परिचय हा आहे की त्यांना रामजीचे ज्ञान उत्पन्न होईल आणि तेच प्राप्त केलेले ज्ञान जगात बोलतील दुसरा परिचय हा आहे की ते जगातील लोकांमधून जे सन्मुख येतील त्यांच्या घटाच्या आत रामजीचा अनुभव करुन देतील.तिसरा यामुळे परिचय त्या संताच्या शरणात नित्य नवे-नवे चतुर हंस

येतच राहतात म्हणजे चालू असतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।४१।।

**कागद केरा फूल पर ।। भंवर न बेसे आय ।।**

**पोफ फूल सुखराम के ।। माडाँ धकेल्या जाय ।।४२।।**

जसे कागदाच्या फुलावर भवरा येऊन बसत नाही परंतु तेच फुल खरे आहे तर भवऱ्याला जबरदस्तीने ही दूर ढकलले तरी ही तो पुन्हा खऱ्या फुलावर येऊन बसतो अशाचप्रकारे मुमुक्षू(हंस)म्हणजे माया काय आणि ब्रम्ह काय ही समज इच्छीणारा हंस केवळी साधु जवळ जुडतच राहतील तो हंस नकली साधु म्हणजे मायेच्या ज्ञानाच्या साधुजवळ जाणार नाही.ही त्या केवली साधुची परीक्षा आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना सांगत आहे. ।।४२।।

**ग्यान बास जन चंदन हे ।। भुजंग जीव कहाय ।।**

**चेटयाँसू सुखराम के ।। अंग ताप सब जाय ।।४३।।**

जसे चंदनाच्या झाडाच्या सुगंधाला समजून भुजंग म्हणजे साप चंदनाच्या झाडाला लपटून जातो आणि आपल्या शरीराच्या आतील तपन मिटवून घेतो असे हंस काळाच्या तपनपासून मुक्त होण्यासाठी ने:अक्षरी साधूच्या शरणात येतो आणि आपल्या तनाची, मनाची आणि येऊन पडणारा ताप सदाकरीता मिटवून घेतो.।।४३।।

**भोजन ब्हो प्रकार का ।। न्यारा केबत घाट ।।**

**जीमे जब सुखराम के ।। अेकी मुख की बाट ।।४४।।**

जसे भोजन अनेक प्रकारचे असते त्याचे रुप ही वेगवेगळे असतात परंतु भोजन करतात तर तोंडाच्या रस्त्यानेच असेच माया आणि ब्रम्हचे ज्ञान वेगवेगळे असतात परंतु ज्ञान स्विकारायचे आहे तर हंसाच्या निजमनाद्वारेच घेतले जाते हंसाच्या निजमनाशिवाय घेतले जात नाही.।४४।

चौपाई ।।

**तुम भी साच हम भी साच ।। ज्यां मन ठेऱ्या सोई ।।**

**के सुखराम अनेकाँ अेही ।। अे जन अेक मे होई ।।४५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानी मनुष्याला सांगून राहिले तुम्ही ही खरे आहात आणि मी ही खरच सांगून राहिलो आहे खरे पहाल तर प्रत्येक जनामध्ये तो साई आहे आणि सर्व त्या साई मध्येच आहे साई तर सत्य आहे तो तर खोटा नाही आहे म्हणून तुम्हीही खरे आहात आणि मी ही खरा आहे माझे मन कैवल्यमध्ये लागले म्हणून मी सत्य आहे आणि तुमचे मन मायेत लागले आणि मायेत सतस्वरुप आहे म्हणून तुम्ही ही सत्य आहात. ।।४५।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम


**रावळ सांग ब्होत ले आया ।। ख्याल सांग जो कीया ।।**
**के सुखराम ज्याँ जो रिज्यो ।। तहाँ दान ले दीया ।।४६।।**

जसे तमाशा करणारे लोक अनेक प्रकारचे सोंग बनवितात तमाशा बघणाऱ्या लोकांना जे सोंग पसंद आले त्यालाच दान देतात म्हणजे पैसे देतात दुसऱ्याला देत नाही असेच काही जन परमात्म्याला पसंत करतात त्याच्याशी लीव लावतात आणि काही लोक मायेला पसंद करतात त्या मायेशी लीव लावतात खरे बघितले तर सर्वांमध्ये रामच राम आहे दुसरे काही नाही.।४६।

साखी ।।

**जन की जैसी भावना ।। तेसा ही हर होय ।।**
**बिन साहेब सुखराम के ।। दूजो सुण्यो न कोय ।।४७।।**

जनाची जशी भावना म्हणजे मनुष्याची जशी भावना राहते त्याप्रकारे साहेब मनुष्या




करीता बनून जातो.साहेबाशिवाय दुसरा कोणी असा असा आजपर्यंत कोणी ऐकले नाही आहे कारण सतस्वरुप ब्रम्ह सर्वांमध्ये ओतप्रोत भरला आहे आणि सर्व ३ लोक १४ भवन,७ द्रिप इ.सर्व साहेबात आहे म्हणजे सर्व ब्रम्ह, माया,३ लोक १४ भवन सर्व स्त्री–पुरुषांमध्ये सतस्वरुप साहेबच आहे. ।।४७।।

**जिण बाणक ज्या ओळख्यो ।। तिण घाटे ईतबार ।।**
**ज्यूं जैसा सुखराम के ।। प्रगटे सिर्जण हार ।।४८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,हंसाने साहेबजीला ज्याप्रकारे ओळखले आहे आणि ओळखल्यावर जसा विश्वास येऊन गेला आहे,तसाच तो साहेब म्हणजे शिरजणहार त्याच्या करीता प्रगट होतो अशाप्रकारे साहेब सर्वांमध्ये बनतो.।।४८।।

**धन जोबन को छाकीये ।। मुरड़ा यो नर जाय ।।**
**पिस्तासी सुखराम के ।। जाँ दिन पकड़यो आय ।।४९।।**

मनुष्य धन तसेच जवानीच्या नशेमध्ये साहेबाशी राहतो म्हणजे अकडलेला राहतो आणि हे विसरुन जातो की हे धन तसेच जवानी साहेबाने दिले आहे म्हणून या धनाचा तसेच जवानीचा उपयोग साहेब प्राप्त करण्याकरीता केल्याने पूर्ण सुख मिळेल. साहेबाच्या वस्तूं पासून जसे धन आणि जवानी मिळाल्याने सुख मिळते तर साहेब प्राप्त केल्याने किती सुख मिळेल.अशा मनुष्याला साहेब प्रगट केलेले संत ही मिळतात तऱ्हेतऱ्हेने ज्ञानाने समजावितात परंतु मनुष्य आपल्या मनाच्या विषय वासनांच्या मस्तीत साहेबाला प्रगट करणे चाहत नाही उलट साहेबाशी बेमुख होऊन मनाच्या

सांगण्याने वासनांचे निचकर्म करतो.शेवटी धन आणि जवानी संपून जाते आणि कुकर्माच्या बदल्यात काळ मनुष्याला पकडून घेऊन जातो तेव्हा तो मनुष्य खुप पस्तावतो.।।४९।।

**बांस बिना चेंटे नही ।। भंवर पोफ कुं आय ।।**
**आ पारख सुखराम के ।। करलो संता माय ।।५०।।**

सुगंधा शिवाय भवरा फूलाला चेटत नाही म्हणजे फूलाला लूंबत नाही,फूलावर येऊन बसत नाही जसे कागदाचे फूल असेल तर भवरा त्यावर बसणार नाही.फुलाला भवरा सुंगून राहीला आहे म्हणजे त्याच्यावर येऊन बसून राहिला आहे म्हणजे फुलात गंध आहे,फुलात वास आहे अशीच संतांची परीक्षा आहे.।।५०।।

**गुण प्रगटयाँ बिन बाहेरो ।। जुग नही लूंबे कोय ।।**
**आ पारख सुखराम के ।। जन की सांची होय ।।५१।।**

जसे फूलात वास म्हणजे सुगंध नसल्याने भवरा फुलाला चेटत नाही,लुंबत नाही अशाच प्रकारे जगातील मनुष्याला जग लुंबतो म्हणजे जगाच्या मनुष्यात काही गुण प्रगट असेल तरच जगाचे मनुष्य त्या जनांना स्पर्श चेटतात ही परीक्षा संताची खरी आहे म्हणजे संतात गुण प्रगट झाल्यावरच संताला जगाचे लोक मानतात. ।।५१।।

**गुण गुण माँही फेर हे ।। बास बास मे जाण ।।**
**जक्त जक्त सुखराम के ।। भंवर भंवर मे ठाण ।।५२।।**

जसे फुलाच्या सुगंधा–सुगंधात फरक राहतो तसेच भवऱ्या–भवऱ्यात ही फरक राहतो सर्व भवरे सर्व फुलांवर ड्किकत नाही काही भवरे काही फुलांवर ड्किकतात तर काही भवरे काही फुलांवर ड्किकतात अशाचप्रकारे संताच्या गुणा–गुणात फेर आहे संत ही दोन प्रकारचे असतात १)एक संत अमरलोकाचे सुख प्रगट करुन देणारे असतात २)दूसरे संत परचे चमत्काराचे म्हणजे मायेचे सुख प्रगट करुन देणारे असतात अशाप्रकारे जगात ही दोन प्रकारचे भक्त असतात. ।५२।

**बास भंवर गत अेक व्हे ।। ज्हाँ जो चेंटे आय ।।**
**यूं दुनियाँ सुखराम के ।। जन सूं लूंबे जाय ।।५३।।**

फुलाचा वास म्हणजे गंध आणि भवऱ्याला आवडणारा वास एक असल्यावरच भवरे त्या फुलाला जाऊन ड्किकतात ते भवरे दुसऱ्या वासवाल्या फुलांना ड्किकत नाही असेच ज्यांना अमरलोक पाहिजे नेहमी करीता सुख पाहिजे असे मनुष्य अमरलोकाचे सुख प्रगट करुन देणाऱ्या संताजवळच जातील आणि ज्यांना मायेचे सुख पाहिजे ते मायेचे परचे चमत्कार करणाऱ्या संताजवळच जातील. ।।५३।।

**बारे बाबो ऊजळो ।। देखत हे सब कोय ।।**

**भीतर तो सुखराम के ।। बोल्यां सूं गम होय ।।५४।।**

कधी कधी जगाचे लोक अमरलोकाचे सुख चाहतात मोक्ष चाहतात ८४,००,००० योनीच्या फेऱ्यातून निघू इच्छीतात परंतु संत ओळखु शकत नाही संत बाहेरुन उज्वल दिसतो म्हणजे संताचे बाहेरुन राहणे चालणे केवली संतासारखे दिसते मायेच्या पलिकडील दिसते परंतु तो संत जेव्हा बोलतो म्हणजे ज्ञान समजवितो तेव्हा समजतो की याच्यामध्ये परमात्मा नाही याच्या आत माया ओतप्रोत भरली आहे म्हणजे काळ भरला आहे.।।५४।।

**राती किया क्या हुवे ।। दिन ही जुँझ्या जाण ।।**
**युं सिंवरण सुखराम के ।। समझ्या सरस बखाण ।।५५।।**

अशा परमात्म्याला प्राप्त करण्याकरीता ८४००००० योनी मध्ये परमात्म्याला विनंती केली,मनुष्य देहाच्या गर्भात विनंती केली की ८४००००० योनीचे दु:ख भोगले गर्भाचे दु:ख भोगले जागो-जागी भटकून संत मायावी आहे किंवा सतस्वरुपी आहे हे शोधले शेवटी सतस्वरुपी संत भेटले असे संत भेटल्यावर परमात्म्याचे स्मरण केले ते महान आहे.।।५५।।

**रात रात तो दोडीयो ।। दिन ऊगे रहे बेस ।।**
**सो मुरख सुखराम के ।। सब नर नारी केस ।।५६।।**

जो मनुष्य साहेबाकरीता ८४००००० योनीत तडपला गर्भात तडपला आणि साहेब प्रगट करुन देणारा संत मिळाल्यावर स्मरण करण्याची वेळ आली तर स्मरण करणे विसरुन गेला आणि मायेच्या करण्यांमध्ये लागून गेला.ते सर्व स्त्री-पुरुष मुर्ख आहे,बेसमज आहे, बेअकली आहे,गवार आहे.।।५६।।

**सुलटो तो सब के फिरे ।। उलटो चडेस साच ।।**
**सब सूं सुण सुखराम के ।। आ इध की हे बाच ।।५७।।**

संखनाळेचा रस्ता तर सर्वांचाच असतो.आईच्या पोटात आले तो संखनाळचा रस्ता आहे.ज्या रस्त्याने आले त्या रस्त्याने परत फिरणे हे आधीपासूनच सर्वांना प्रगट असते परंतु हे फिरणे खरे फिरणे नाही याच्याने गर्भात येणे सुटत नाही उलटून बंकनाळेच्या रस्त्याने चढाल तर परत गर्भात नाही येणार हे खरे फिरणे आहे हे सर्व जन ऐका बंकनाळचा रस्ता प्राप्त करणे ही मोठी गोष्ट आहे.।।५७।।

**करणहार तो राम हे ।। प्रालब्द के हात ।।**
**मो सिर तो सुखराम के ।। जस कुजस की बात ।।५८।।**

सर्व सृष्टीमध्ये करणारा फक्त रामजी आहे रामजीने मला माझ्याच संचितातून प्रारब्ध दिले आहे प्रारब्धाच्या अनुसार माझ्या शिरावर मायेमध्ये यश अपयश येते असे ज्ञानी,

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

ध्यानी समजतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५८।।

**जब लग के भ्यासो नही ।। जे सिंव्रण की ढील ।।**
**भ्यास्यो ज्याँ सुखराम के ।। सब बाँता की हील ।।५९।।**

यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज त्या मनुष्याला सांगतात की प्रारब्धाच्या यश अपयशाच्या पलिकडे परमात्मा आहे तो परमात्मा मिळाला नाही कारण त्याने परमात्म्याच्या स्मरणात ढिल केली जर स्मरणात ताकद लावली असती तर साहेब त्या मनुष्याच्या घटात आणि सर्व हर प्राप्त करण्याचे चेन होऊन गेले असते.।।५९।।

**हर भ्यास्यां तहाँ जाणीये ।। आट पोहर लिव ध्यान ।।**
**नई तर तो सुखराम के ।। केणे को मुख ग्यान ।।६०।।**


काही मनुष्य हर भासला म्हणून सांगतात परंतु त्यांची लीव आणि ध्यान मायेत राहते. यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले जर हर भासला आहे तर त्या संताची लीव आणि ध्यान साईमध्ये मायेत राहणार नाही मायेमध्ये लीव व ध्यान राहते आहे तर त्याला हर भासला नाही तो फक्त मुखाने बोलतो की साहेब मला मिळाला आहे. ।।६०।।

**ओऊँ दही बिलोविंया ।। अंच्छा घी छंट जाय ।।**
**न्यारो कर सुखराम के ।। त्रगुटी मे जन खाय ।।६१।।**

दह्याला घुसळल्याने ताकापासून तुप वेगळे होऊन जाते तसेच त्रिगुटीमध्ये ओअम म्हणजे बावन्न अक्षरांचे राम या माया शब्दाने तत्त म्हणजे र शब्द वेगळा होऊन जातो त्या शब्दाचा आनंद संत त्रिगुटी मध्ये घेतो.।।६१।।

**अंछा घी जब पी गया ।। तब जन हुवा राम ।।**
**इण आगे सुखराम के ।। केवळ को सतधाम ।।६२।।**

असे ताकापासून वेगळे झालेले तुप पिणारा तनमस्त होऊन जातो असेच त्रिगुटीमध्ये रक्कार प्रकट करणारा काळापासून मुक्त झालेला राम होऊन जातो.या त्रिगुटीच्या पुढे केवल म्हणजे मायामुक्त सतधाम आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।६२।।




**नर नारी सब फिरत हे ।। सेर सेर के माय ।।**
**गढ ऊपर सुखराम के ।। बिर्ळो किणी संग जाय ।।६३।।**

जसे जगातील स्त्री-पुरुष शहरा-शहरात फिरतात परंतु गडावर कोणी विरळाच जातो.असेच सर्व स्त्री-पुरुष होणकाळाचे ३लोक १४ भवनात मायेच्या सुख दु:खात फिरतात होणकाळाच्या पलिकडील गडावर कोणी सतगुरुच्या संगाने विरळाच पोहचतो.।।६३।।

**ललोपतो कर राखीयो ।। सो सिष सुधरे नाय ।।**
**सेवग सुंई सुखराम के ।। कुछ माफक सो कुवाय ।।६४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी संताला चेतावणी दिली आहे की,शिष्याला खुशामत करुन करुन ठेवल्याने शिष्य सुधरत नाही असा शिष्य जो नोकरीवर राहणाऱ्या नौकरापेक्षा ही हलका आहे असे समजा.नौकरीवर राहणारा नौकर ही आपल्या मालकाच्या आज्ञेत राहतो जेव्हा की याचे घेणे–देणे तर फक्त मायेच्या व्यवहारापुरतेच असते परंतु गुरु शिष्याचा व्यवहार आवागमन कापण्याशी राहतो असे आवागमन कापून देणारे संतांच्या आज्ञेत जो शिष्य राहत नाही अशा शिष्याची गुरु खुशामत करतो त्या गुरुचा गुरुधर्म खरा नाही हे समजणे.।।६४।।

**ज्यां ने प्रगट पूजीये ।। जिण घर जीम्या हाण ।।**
**सुणज्यो सब सुखराम के ।। आ तुम करो पिछाण ।।६५।।**

याची ओळख जगाच्या लोकांनो तुम्ही करा.शिष्य गुरुची प्रगट पुजा करतो आणि गुरुच्या येथे भोजन केल्यावर नुकसान होईल हे समजतो आणि अशा शिष्याची गुरु खुशामत करतो हे कसे योग्य आहे?हे तुम्ही ज्ञानाने समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।६५।।

**खांचा ताणो करत हे ।। थाप उथाप जग माय ।।**
**जब लग सुण सुखराम के ।। हर पायो हे नाय ।।६६।।**

असा शिष्य मायेला समोर ठेऊन गुरुज्ञानाला ओढत ताणत असतो ओढा ताणी करीत राहतो धापतो उधापतो तर समजावे त्या शिष्याला साहेब मिळाला नाही जसे गुरुला पुजतो ही विधी बरोबर आहे हे सांगतो सोबत गुरुच्या येथे जेवण का जेवत नाही? खाण्यात कसा दोष आहे असे कोणतेही मायेचे कारण ओढून ताणून शिष्य सांगण्याचा प्रयत्न करतो समजावे त्याला साहेब मिळाला नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।६६।।

**पाहण ऊपर भाण रे ।। तपीयाँ गळे न कोय ।।**
**सुणज्यो सब सुखराम के ।। गड़ो तुर्त जळ होय ।।६७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी शिष्याचे काही प्रकार सांगितले आहे जसे दगडावर सुर्य कितीही तापला तरीही दगड गळत नाही अशाचप्रकारे पक्क्या मायावी जीवाला कितीही ज्ञान दिले तरीही तो साहेबाला धारण करणार नाही परंतु गारेला थोडी ही गरमावत(गर्मी)लागली तर ती पाणी होऊन जाते असेच सतस्वरुपी वैराग्य वृत्तीच्या हंसाला ज्ञान देताच ज्ञान धारण करुन घेतो आणि साहेबाच्या आदघरी पोहचून जातो.।।६७।।

**केईक जीव सुण धात सा ।। केईक पाहण सम होय ।।**
**केईक जीव सुखराम के ।। लाख मेण सा जोय ।।६८।।**

असे कित्येक जीव धातू सारखे असतात.कित्येक जीव दगडासारखे असतात.कित्येक जीव लाखे सारखे असतात कित्येक जीव मेणासारखे असतात.।।६८।।

**केईक जीव घी खांड सा ।। केईक नाज सम होय ।।**
**केईक जीव सुखराम के ।। गडे स्वरूपी जोय ।।६९।।**

कित्येक जीव तुपासारखे असतात तर कित्येक जीव अन्नासारखे असतात तर कित्येक जीव साखरेसारखे असतात तर कित्येक जीव गारे सारखे असतात.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले.।।६९।।

**घ्रत खांड बी प्रगळे ।। लाख मेण बी जोय ।।**
**पण पथर तो सुखराम के ।। प्रथ गळे नही कोय ।।७०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जसे तुप पघळते वितळते साखर वितळते, लाख वितळते आणि मेण ही वितळते परंतु दगड तर काहीही केल्याने वितळत नाही त्याच प्रकारे जो जीव तुपासारखा,साखरे सारखा,लाखे सारखा,मेणासारखे असतात असे जीव ज्ञान धारण करुन घेतात परंतु दगडासारखे जे जीव असतात त्यांना कितीही ज्ञान दिले तरी ही ते ज्ञान धारण करत नाही. ।।७०।।

**धात गळे सुण आग सूं ।। पण सोगी बिन नाय ।।**
**पाळे कूं सुखराम के ।। गळता बार न काय ।।७१।।**

काही जीव दगडासारखे असतात ते बिलकुल ज्ञान धारण करीत नाही आणि काही जीव गारे सारखे आहेत जे थोडेसे ज्ञान मिळताच ज्ञान धारण करुन घेतात न गळणारे आणि गळणारे यांच्या मधले जीवाबाबत आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.

धातु -----

लाख-जोपर्यंत आगीजवळ राहतात तोपर्यंत वितळलेले राहतात आगीपासून दूर होताच कड्क होऊन जातात असेच जोपर्यंत कैवल्य ज्ञानात राहतील तोपर्यंतच मानतात आणि ज्ञानापासून बाहेर निघाले.तर कोणते कैवल्य ज्ञान स्पष्ट बदलून जातात.

तुप-जसे तुपाला आस लागताच वितळते तसेच तुपा सारखे जे जीव असतात ते संत सतगुरु दिसताच त्यांचे बोलणे राहणीमान बघताच ते लगेच ज्ञान धारण करतात परंतु संसाराच्या लोकात गेले की त्यांच्यासारखे होऊन जातात.

अनाज- जसे लोकांना आधी थंडे ज्ञान म्हणजे गोड ज्ञान द्यावे लागते होणकाळाचे दु:ख,अमरलोकात असे सुख आहे आणि परत गरम म्हणजे कड्क ज्ञान द्यावे लागते म्हणजे जे त्यांना पसंत नाही असे ज्ञान द्यावे लागते.

साखर–साखरे सारख्या जीवाला थंडे म्हणजे गोड ज्ञान द्यावे लागते तेव्हा तो जीव ज्ञान धारण करतो.।।७१।।

**सतसंगत पल की भली ।। करसी ब्हो गुण ज्योय ।।**
**जुग जुग मे सुखराम के ।। सेंस गुणों फळ होय ।।७२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,सतस्वरुपाची संगत क्षणाची ही असली तरी ही ती खुप उंच आहे,खुप गुणकारी आहे आणि मायेच्या ज्ञानाची संगत नेहमी जरी झाली तरीही तिच्यात काळाचा धोका आहे.ही क्षणभराची संगत अमरलोक जाण्या सारखा भारी गुण करेल.जोपर्यंत हंस अमरलोकात जात नाही तोपर्यंत होणकाळात हंसाला युगानुयुग हजारो पद काळापासून वाचविण्यासारखे उंच फळ देईल मायेच्या पर्चे चमत्काराकडे जाऊ देणार नाही भूत,प्रेत बनु देणार नाही,नरकात जाऊ देणार नाही आणि ८४००००० योनीं मध्येही वरच्या वर ठेवेल संगत ऐकल्यावर हा हंस होणकाळ विसरुन जातो आणि परमात्माच सर्व काही आहे असे त्याला वाटते असा क्षण मग तो क्षणभराकरीता का न असो.।।७२।।


**नेणा बिन सुझे नही ।। बिन लागाँ नही चीत ।।**
**भ्याँस्यां बिन सुखराम के ।। अग्यानी की रीत ।।७३।।**

जसे मायावी वस्तु मायावी डोळ्यांनी कधी ही पाहिली तरीही आठवण येते जसे कोणाला भारी ठोकर लागली तर त्याचे ठोकरच्या जागेवर चित्त राहते असेच ज्याला परमात्मा मिळाला आहे त्याचे चित्त नेहमी परमात्म्यातच राहील ज्याचे चित्त परमात्म्यात नाही,मायेत आहे तर समजावे तो अज्ञानी आहे त्याला हर मिळाला नाही. ।।७३।।


**सतगुर की संका नही ।। भै डर प्रथन होय ।।**
**से सिष तो सुखराम के ।। प्रथन निपजे कोय ।।७४।।**

ज्या शिष्याला सतगुरुची मर्यादा नाही,सतगुरुचे भय बिलकुल नाही तसेच सतगुरुचे भय मनात ठेवत नाही अशा शिष्यामध्ये परमात्मा कधी ही प्रगट होणार नाही. ।।७४।।

**हर गुरू अेकी जाणीये ।। सतगुरू फेर बेसेस ।।**
**जे निपजे सुखराम के ।। जुग जुग मे संत देख ।।७५।।**




ज्या ज्या मनुष्याने केवली गुरु म्हणजे संताला आणि रामजीला एक मानले आहे तसेच ज्याच्याकडून भेद मिळतो अशा सतगुरुला रामजी पेक्षा ही विशेष मानले आहे त्या मनुष्यात परमात्मा प्रगट झाला आहे.असे समजणारे मनुष्य युगानुयुगापासून मनुष्याचे संत बनले आहे हा प्रगट दाखला बघुन घ्या. ।।७५।।




गज माने आंकस सही ।। युं गुरू को डर होय ।।
से सिष कूं सुखराम के ।। काळ न झापें कोय ।।७६।।

जसे गज म्हणजे हात्ती अंकुशला घाबरतो तसेच सतगुरुला परमात्मा समजून घाबरतो,परमात्मा समजून मर्यादा ठेवतो त्या शिष्यावर काळ कधी ही झडप घालणार नाही. ।।७६।।

जब लग झूठा बेण व्हे ।। तब लग सिद्ध न होय ।।
सिध्ध साधक सुखराम के ।। क्या नर नारी लोय ।।७७।।

जो पर्यंत ज्याचे सांगितलेले वाक्य खोटे होऊन जातात तोपर्यंत त्याला सिध्द समजू नका कारण की सिध्द त्यालाच म्हणतात ज्याचे म्हणणे खरे होते मग तो सिध्द असो वा साधक असो किंवा मग कोणीही स्त्री-पुरुष असो ज्यांचे बोल(वचन)खरे होत नाही तोपर्यंत त्याला पूर्ण सिध्द समजु नका जगाच्या बरोबरीचा मनुष्य समझा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगून राहिले आहे.।।७७।।

सिर जावे तो जाण दो ।। झूट न बोलो कोय ।।
साहेब तो सुखराम के ।। साच बेण मे होय ।।७८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील लोकांना सांगतात की डोके कापले गेले म्हणजे कितीही भारी नुकसान झाले तरी ही होऊ द्या,खोटे बोलु नका खोट्यात यम बसला आहे तो घेरुन त्यापेक्षा ही जास्त नुकसान करवेल म्हणून खोटे न बोलता सत्य बोला सत्यात साहेब बसतो तो कशाही नुकसानातून वाचवेल किंवा झालेल्या नुकसानातून फायद्यात आणून देईल. ।।७८।।

काया कस करणी करे ।। मुख बायक हे झूट ।।
तब लग सुण सुखराम के ।। पच खाली गये ऊठ ।।७९।।

शरीराला कष्ट देऊन-देऊन वेदांच्या करण्या करतो आहे(व्रत,उपवास,तप इत्यादी) परंतु तोंडाने खोटे बोलतो आहे असे साधक कितीही पचून गेले तरीही यांना मायेच्या करण्यांचे फळ लागणार नाही तर यांच्या घटात साहेब कसा प्रगटणार?असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाला सांगून राहिले आहेत. ।।७९।।

झूट पाप को पेड़ हे ।। साच पुन्न की चूळ ।।
नाव निझ सुखराम के ।। असल मोख को मूळ ।।८०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात खोटे बोलणे हे पापाचे म्हणजे नरकात पडण्याचे झाड आहे.तसेच खरे बोलणे हे पुण्य म्हणजे स्वर्गादिका मध्ये जाण्याचे मुळ आहे तसेच निजनामचे स्मरण करणे अस्सल मोक्ष म्हणजे महासुखाचा देश प्राप्त करण्याचे मूळ आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।८०।।

समझ्याँ बिन सिवंरण नही ।। कण बिन केसा भोग ।।
चडीयाँ बिन सुखराम के ।। क्या त्यागी तन जोग ।।८१।।

निजनाम काय आहे हे समजल्या शिवाय तसेच निजमनाने स्मरण केल्याशिवाय साहेब मिळणार नाही.जसे अन्नाशिवाय भोजन होऊ शकत नाही पोट भरु शकत नाही तसेच मायेमधून चित्त काढून सतस्वरुपाचे स्मरण नाही केले तर साहेब मिळत नाही शरीरावर वेष योगाचा धारण करुन संसार सोडून योगी होत नाही योगी तर तोच असतो ज्याने ५ आत्मा आणि मनाला त्यागून दिले,त्रिगुणी मायेला त्यागले आणि बंकनाळेच्या रस्त्याने ब्रम्हंडात चढून गेला तो खरा योगी असतो.।।८१।।

स्वर्ग नर्क हर बिन नही ।। सुणो सकळ जन आण ।।
सतगुरू बिन सुखराम के ।। आ नही पड़े पिछाण ।।८२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जगातील लोकांना सांगतात स्वर्ग,नर्क हर म्हणजे रामजी शिवाय नाही परंतु खरे सतगुरु धारण केले नाही तोपर्यंत स्वर्गातही हर आहे आणि नरकातही हर आहे हे समजु शकत नाही सतगुरु धारण केल्यावर सतस्वरुप सर्वात आहे आणि सर्व ३ लोक १४ भवन,स्वर्ग,नर्क हे हर मध्ये आहे असे स्पष्ट दिसते.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।८२।।

बावण अंछर बाहेरो ।। तेपन गहयो न जाय ।।
सुण ग्यानी सुखराम के ।। समज सोच मन मांय ।।८३।।

बावन्न अक्षरात साहेब नाही आहे ५२ अक्षरांनी साहेब प्रगट केला जात नाही म्हणजे ५२ अक्षरांच्या ज्ञानाने,वेद,व्याकरण,शास्त्राच्या करण्यांनी साहेब घटात प्रगट केले जात नाही ५२ अक्षर ज्याच्या आधारावर आहे असा ५३ अक्षर जे ओअम,सोहम,अजप्पा पासून बनले आहे म्हणजे ज्याला ज्ञानी श्वास म्हणतात अशा श्वासाच्या ओअम, सोहम, अजप्पाच्या साधनेने ही तो परमात्मा प्रगट केला जात नाही असा ज्ञानींना निजमनाने विचार करायला आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।८३।।

चोपाई ।।

बावन परे तेपना अंछर ।। सो सासा दम होई ।।
के सुखराम अठा सूं आगे ।। फेर हरफ हे दोई ।।८४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात ५२ अक्षरांच्या पलिकडे त्रेपन्नावे अक्षर हे श्वास आहे त्याच्या पुढे अजुन दोन शब्द आहेत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानींना सांगतात. ।।८४।।

साखी ।।

संग बिना तो भाव नही ।। भाव बिना नही प्रित ।।
प्रीत बिना सुखराम के ।। नही भजन की चीत ।।८५।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

ते शब्द सतगुरुचा संग कराल तर प्रगट होतील सतगुरुच्या संगाने सतगुरु हाच परमात्मा आहे हा भाव बनेल हा भाव ५४वा शब्द आहे हा प्रगटल्यावर सतगुरुरुपी परमात्माच मला काळाच्या मुखातून सहजमध्ये काढू शकतील हा विश्वास होऊन जातो यामुळे सतगुरुरुपी परमात्म्याशी प्रिती येताच हंस सतगुरुरुपी परमात्म्याने दिलेले रामनाम चितमनाने रटण करतो आणि साहेब हंसाच्या घटात प्रगट होऊन जातो.।।८५।।


**सासा संग सुखराम के ।। राम नाम लिव होय ।।**
**तो तेपन की क्या चली ।। ले पचपन कूं जोय ।।८६।।**

श्वासाच्या संगाने म्हणजे ओअम,सोहम,अजप्पामध्ये रामनाम लिव रटण केल्यावर त्रेपन्नावे अक्षर म्हणजे श्वासाच्या साधनेची गोष्टच सुटून जाते आणि पंच्चावन्नवा शब्द प्रगट होऊन जातो म्हणजे सतगुरुशी प्रित येऊन जाते हे दिसते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।८६।।

**तेपन तेपन क्या करे ।। चोपन कहिये मोय ।।**
**पचपन बिन सुखराम के ।। भेद न लाधे कोय ।।८७।।**

तो ज्ञानी ५३/५३ म्हणतो म्हणजे सोहम सोहम म्हणतो सोहम शिवाय परमात्मा मिळत नाही असे म्हणता तेव्हा आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले अरे त्रेपन–त्रेपन काय करतो म्हणजे सोहम सोहम काय करतो त्रेपन्नच्या पलिकडील चौपन्न आणि चौपन्नच्या पलिकडील पंचावन्न सांग पंचावन्न शिवाय सतस्वरुपाच्या देशाचा म्हणजे ने:अक्षरला म्हणजे सतशब्दाला प्राप्त करण्याचा भेद मिळत नाही. ।।८७।।

**ररे ममे बिन मन सूं ।। तेपन रहे संभाय ।।**
**वे हदमे सुखराम के ।। बेहद कदे न जाय ।।८८।।**




जो ध्यानी रक्कार तसेच मक्कार शिवाय मनाने हट्ट करुन त्रेपन्नला धारण करतो तो हद्दीतच राहतो तो होणकाळातच राहतो, त्याला काळ खातो तो बेहद म्हणजे महासुखात कधी जात नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।८८।।

**अेक प्रीत तो ग्यान की ।। अेक कोड की जाण ।।**
**राम मिले सुखराम के ।। तका पीड़ की ठाण ।।८९।।**

प्रित–प्रित मध्ये फरक एक प्रित ज्ञानाची असते तो पंचावन्नावा शब्द नाही या प्रितमध्ये फक्त ज्ञान ऐकण्याची इच्छा असते.या प्रितीने साहेब मिळत नाही एक प्रित कोड्की असते म्हणजे सर्व सतगुरुच्या दर्शनाला जातात तर आम्हीही दर्शनाला चला ही कोड असते त्या हंसात परमात्मा प्राप्त करण्याची जशी इच्छा पाहिजे तशी असत नाही हि

प्रित ही पंचावन्नवा शब्द नाही आहे एक प्रित अशी असते जिच्यात हंसाला वासनिक माया खारी वाटते या वासनिक मायेत विक्राळ जुलमी काळ आहे असे भासते.या काळातून काढणारा फक्त रामजी आहे अशा काळातून नाही निघाले तर कसे कष्ट पड्तील याची हंसाला खुप पिडा(कष्ट)होते आणि पिडेमुळे हंस सतगुरुशी हंस होणकाळातून निघण्याकरीता प्रित करतो त्याला पंचावन्नवा शब्द म्हणतात. ।।८९।।

**ररे ममे बिन मन सूं ।। तेपन रहे संभाय ।।**

**से सपने सुखराम के ।। पिछम घाट न जाय ।।९०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज या साखीमध्ये सांगतात,रक्कार व मक्कार विना मनाने कोणी ज्ञानी त्रेपन्नावे अक्षर म्हणजे सोहम धारण करेल तो ज्ञानी स्वप्नातही म्हणजे कधीही पश्चिमच्या घाटाने म्हणजे बंकनाळेच्या रस्त्याने जाणार नाही असा साधक होणकाळातून कधी ही निघणार नाही.।।९०।।

**राम नाम सुखराम के ।। रटे प्रीत सूं आय ।।**

**तो मोख मुगत की क्या चली ।। प्रममोख मिल जाय ।।९१।।**

आदि सतगुरु सुखरामजी सांगतात,रामनाम परमात्मा प्राप्त करण्याच्या पिडेच्या प्रितीने येत्या जात्या श्वासात रटण करेल तर मोक्ष मुक्ती तर सोडून द्या अस्सल परममोक्ष म्हणजे महासुखाचा देशच मिळेल असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।९१।।

**पढया ब्होत सुखराम के ।। जब लग थीर नही कोय ।।**

**भ्रम गयो दुबध्या मिटी ।। अब भजो नचीता होय ।।९२।।**

बावन्न अक्षरांचे ज्ञान खुप वाचल्याने हंस स्थीर होत नाही,कारण की ५२अक्षरांच्या ज्ञानाची जपज इच्छेपासून आहे म्हणजे मायेपासून आहे माया अमर नाही,नाश होते,अशी अस्थिर आहे अशा ज्ञानाचा किंवा ध्यानाचा आधार घेतल्याने हंस स्थीर होत नाही जेव्हा सतगुरु भेटतात,त्यांचे ज्ञान ऐकतात,ज्ञानाने माया काय आहे,सतस्वरुप काय आहे हे समजमध्ये येते तेव्हा हंसाला माया ही अस्थिर आहे हा विश्वास होऊन जातो आणि हंस स्थीर होऊन साहेबाला भजतो आणि साहेबाला प्राप्त करतो जेव्हा हंस स्थीर होतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।९२।।

**अर्थ किया बाणी कथी ।। जब लग जाण्या दोय ।।**

**भ्रम भागा सुखराम के ।। ज्याँ त्याँ अेकी होय ।।९३।।**

जो ज्ञानी मायेचा अर्थ करतो मायेची वाणी बोलतो तोपर्यंत त्या ज्ञानीला साहेब मिळाला नाही समजावे तो ज्ञानी साहेब न मिळाल्याकारणाने साहेब आणि माया असे दोन वेगवेगळे जाणतो.ज्याला साहेब मिळतो त्याला मायेचे अस्तित्व दिसतच नाही त्याला

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।


फक्त साहेब दिसतो म्हणून त्याला माया व ब्रम्ह असे दोन आहेत हा भ्रम राहत नाही. फक्त ब्रम्हच आहे अशी साफ समज राहते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.।।९३।।

**अर्थ थक्या बाणी थकी ।। थकी सकळ रस रीत ।।**
**जब हंसो सुखराम के ।। गयो त्रगुटी जीत ।।९४।।**

अर्थ थकला म्हणजे वेद,व्याकरण,शास्त्र या मायेच्या ज्ञानाची इच्छा थकुन गेली,मायेचे ज्ञानाचे शब्द,बोलण्याची इच्छा राहीली नाही तसेच मायेच्या करण्या जसे व्रत,एकादशी, उपवास,तप इत्यादी करण्याची रीत थकुन गेली तेव्हा समजावे की हंस त्रिगुटी पार करुन गेला म्हणजे खंड–३ लोक १४ भवन म्हणजे मायेचा देश पार करुन गेला. ।।९४।।

चौपाई ।।

**ब्रम्ह ग्यान मे हर कन सांसो ।। मे ते कदे न आवे ।।**
**के सुखराम नेक मन फिरीयां ।। ब्रम्ह ग्यान नही कुवावे ।।९५।।**




आदि सतगुरु सुखरामजी स्वयम कथित ब्रम्हज्ञानीच्या वर सांगतात की ब्रम्हज्ञान म्हणजे होणकाळ ब्रम्हज्ञान प्राप्त झाल्यावर साधकाला मायेचा हर्ष ही राहत नाही आणि काळाची फिकीर ही राहत नाही अशा साधकामध्ये मी तु असा भाव राहत नाही ब्रम्हज्ञानीला माया दिसत नाही सर्वांमध्ये(होणकाळ)ब्रम्ह दिसतो सतस्वरुप ब्रम्ह अमर आहे त्याच्यात होणकाळ ब्रम्ह आहे तसेच माया आहे अशा साधुला सर्वांमध्ये जसे सतस्वरुप दिसतो तसेच होणकाळ ब्रम्हच्या साधकाला मायेमध्ये(होणकाळ)ब्रम्हच दिसतो ज्याला होणकाळ ब्रम्ह आणि माया असे दोन दिसतात ते(होणकाळ)ब्रम्हज्ञानी नाही आहे असे समजावे. ।।९५।।

**डेढ होय के मिले हे हर मे ।। सो लगे ब्रम्ह कूं प्यारा ।।**
**के सुखराम समज दिल भीतर ।। किनि अर्थ बिचारा ।।९६।।**


निच घरात जन्मला जेथे सर्व निच कर्म चालतात अशा मनुष्याने साहेब प्राप्त करुन घेतला तर तो हंस ब्रम्ह म्हणजे साहेबाला प्राप्त केले नाही तो हंस परमात्म्याला प्रिय वाटत नाही याचा हृदयात विचार करा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।९६।।

**तीन लोक मे देख बिचारी ।। साहेब बिना न कोई ।।**
**के सुखराम कजी बिन जुग मे ।। निंद्या करे न लोई ।।९७।।**

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

तिन्ही लोकांमध्ये विचार करुन बघा साहेब म्हणजे सतब्रम्ह शिवाय दुसरा कोणी ही नाही म्हणजे सर्वांमध्ये सतब्रम्ह आहे तर मग जगात संतांची आणि संतांकडून जगाची निंदा का होते?आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात निंदा तेव्हा होते जेव्हा सतब्रम्ह शुध्द सतब्रम्ह राहत नाही त्या सतब्रम्हात होणकाळी मायावी विषय वासना राहते इ.या मायावी निच वासनेच्या कसरमुळे साधु असो वा जगत असो यांना काळाचे दु:ख भोगावे लागते आणि या कसरमुळे निंदा होते.।।९७।।

**कजी ब्रम्ह की ब्रम्ह बतावे ।। प्रगट जुग के माही ।।**
**के सुखराम जक्त की जन केहे ।। जक्त संत की कवाही ।।९८।।**



३ लोक १४ भवनमध्ये,९खंडात सर्व स्त्री-पुरुषात ब्रम्ह आहे म्हणजे साहेब आहे आता ज्यांची निंदा होते त्याच्यातही साहेब आहे आणि जो निंदा करतो त्याच्यातही साहेब आहे म्हणजे दोघांमध्येही साहेब आहे.साहेब दोघांमध्ये असल्यावरही संसारी लोकांची निंदा साधु करतात आणि साधुची निंदा जगाचे लोक करतात. ।।९८।।

**ज्यां मे कजी नेक भर नाही ।। तां को निंदे न कोई ।।**
**के सुखराम घणी तो निंद्या ।। घणी कसर की होई ।।९९।।**

ज्या साधुमध्ये किंवा संसारी मनुष्यात थोडीही कसर नसेल तर त्या साधुची किंवा संसारी मनुष्याची कोणी ही निंदा करणार नाही जर साधुची किंवा संसारी मनुष्याची निंदा जगात खुप होत असेल तर समजावे त्या साधुमध्ये किंवा संसारी मनुष्यात खुप कसर आहे जसे सतस्वरुपी संत आहे होणकाळी निच वृत्त्या ठेवत असेल तर संसाराचे सतस्वरुपी विचारावाले मनुष्य त्या संताची निंदा करतील आणि जगाचे मनुष्य होणकाळी वृत्ती ठेवत असतील तर सतस्वरुपी साधु जगातील मनुष्याची निंदा करतात जसे मायेच्या लोकात आपसात निंदेचा व्यवहार नेहमी प्रगट दिसतो उंच कर्मी मायावी व्यक्ती निचकर्मी मनुष्याची नेहमी निंदा करतो १)उदा.दयाळू मनुष्य क्रूर मनुष्याची नेहमी निंदा करतो २)समाधानी मनुष्य लोभी मनुष्याची निंदा करतो कारण की दयाळू मनुष्य क्रूर मनुष्यात तसेच समाधानी मनुष्याला लोभी माणसात भविष्यात दु:ख पडतील हे दिसते.अशाचप्रकारे सतस्वरुपी हंस होणकाळी मायावी हंसांची निंदा करतात कारण की,सतस्वरुपी हंसाला मायावी मनुष्याचे काळाचे दु:ख दिसत राहतात आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी हा विषय स्वयंम कथित ब्रम्हज्ञानीवर सांगितला आहे हा ब्रम्हज्ञानी,ब्रम्हज्ञानी नव्हता आणि ब्रम्हज्ञानाच्या नावावर सर्व निचकर्म करत होता आणि संसारी लोक त्याची निंदा करत होते या स्थीतीवर गुरु महाराजांनी ह्या तीन साख्या सांगितल्या आहेत की,तुझ्यातही ब्रम्ह आहे आणि जगाच्या लोकातही

ब्रम्ह आहे मग तुझी खुप निंदा का होऊन राहिली?याचा विचार कर जर तुझ्यात शुध्द ब्रम्हच राहिला असता आणि निच कर्म राहिले नसते तर जगातील लोक तुझी निंदा करतच नसते.।।९९।।

।। साखी ।।

**प्रीत लगी पिव पाविया ।। जिण तिण घाटे जाय ।।**
**जहाँ जहाँ नर सुखराम के ।। मगन हुवा मन माय ।।१००।।**

सतसंगत म्हणजे सत परमात्म्याची संगत कोठे ही असो त्याच्यात खास जागा किंवा खास नावाचा साधु असे काही कारण राहत नाही जेथे जेथे सतसाहेबाची संगत होते तेथे साहेबच राहतो तेथे जर जगातील स्त्री-पुरुष गेले आणि त्या सतगुरुत बसलेल्या साहेबाशी प्रित लावून घेतली तर त्या स्त्री-पुरुषात साहेब प्रगट किंवा प्राप्त होईल आणि ते हंस स्वत:च्या उरातून साहेबात मग्न होऊन जातात. ।।१००।।

**पायाँ बिन गर्जे नही ।। मगन हुवो नही जाय ।।**
**जे व्हे तो सुखराम के ।। थोडा दिन रेहे माय ।।१०१।।**

असे स्त्री-पुरुष साहेब प्राप्त केल्यावर जगात प्राप्त केला गर्जेने सहीत साक्ष भरतात आणि त्या साहेबात खुप मग्न राहतात.काही साधु ज्यांनी साहेब प्राप्त केला नाही आणि साहेब प्राप्त केला असे खोटेच मनात मग्न राहतात अशा साधु करीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की ते खोटे मग्न होण्याचा प्रयत्न करतात तरी ही ते थोडेच दिवस मग्न होतात परत जसेच्या तसे संसारासारखे पूर्व स्थितीत येऊन जातात. ।।१०१।।

**जब लिव लागी नही ।। तब लग केणी झूट ।।**
**सुणज्यो सब सुखराम के ।। आ पारख की मूट ।।१०२।।**

साधुला साहेब मिळालाच नाही याची पारख आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. परमात्मा हंसाला मिळाला आहे तर हंसाची लीव फक्त परमात्म्यात राहील.मायावी कर्मकांडात कधी जाणार नाही जर मायावी कर्मकांडामध्ये लीव जाते तर समजावे त्या साधुला साहेब मिळाला नाही तो खोटे बोलत आहे.।।१०२।।

**सोझी बिन संगत नही ।। बिन समज्यां नही ग्यान ।।**
**सतगुर बिन सुखराम के ।। नही निरंजन ध्यान ।।१०३।।**

ज्या साधुला परमात्मा साहेब मिळाला नाही अशा साधुची संगती करणे म्हणजे साहेबाची संगती करणे नाही अशा संगतमध्ये साहेब काय आहे हेच समजत नाही त्या ज्ञानाला साहेबाचे ज्ञान कसे समजतात?त्याच्यात काळ राहतो अशा गुरुची संगत केल्यावर निरंजन सतस्वरुप परमात्म्याचे ध्यान कसे बनेल आणि तो साहेब घटात कसा

प्रगट होईल? ।।१०३।।

**प्रेम प्रीत ने: चो भयो ।। खरा खरी को आण ।।**
**जिण जनमे सुखराम के ।। कसर कोर मत जाण ।।१०४।।**

असा सोझी म्हणजे जाणकार शोधा ज्याचे साहेबाशी खरे प्रेम आहे,खरी प्रित आहे आणि असा जाणकार साधु जो काळाच्या भयापासून निर्भय होऊन निश्चल झाला आहे अशा संताची संगत खरी आहे अशा संतामध्ये होणकाळी किंवा मायावी कोणती कसर नाही हे समजा. ।।१०४।।

**प्रीत लगी अक बक भयो ।। जाँ सुण कसर न काय ।।**
**जोग जिग सुखराम के ।। जप तप सब ही माय ।।१०५।।**

अशा सतगुरुशी प्रित लागल्यावर त्या प्रितीत तो हंस अकबक होऊन जातो अशा हंसात सतगुरुशी प्रेम करण्यात कोणतीही होणकाळी कसर नाही हे समजा अशा सतगुरुशी अकबक प्रेम झालेल्या त्या संतात लगेच साहेब प्रगट होऊन जातो असा साहेब प्रगट झालेल्या संताला मायेचे योग-पवन योग,अष्टांग योग,सांख्य योग इत्यादी तसेच सर्व प्रकारचे यज्ञ,सर्व प्रकारचे मायावी जप,सर्व प्रकारचे तप सहजात आपो आपच होऊन गेले हे जगाचे सर्व स्त्री-पुरुषांनो ज्ञान बुध्दीने समजा. ।।१०५।।

**जप तप करणी जिग सो ।। भजन समो नही कोय ।।**
**प्रेम सम सुखराम के ।। नाम भजन नही होय ।।१०६।।**

जप,तप,वेदांच्या सर्व करण्या,सर्व यज्ञ हे सर्व साहेबाच्या भजनासारखे नाही आणि साहेबाचे नाम जप हे साहेबाशी प्रेम येण्यासारखे नाही आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१०६।।

**प्रेम ज्हाँ हर आप हे ।। नेम ज्हाँ गुण होय ।।**
**अक बक ज्हाँ सुखराम के ।। ब्रम्ह कहावे जोय ।।१०७।।**

शिष्याला सतगुरु हा परमात्मा दिसल्याने जे प्रेम येते ते प्रेम म्हणजेच हर आहे.त्या प्रेमातच हर प्रगटण्याची विधी आहे जो शिष्य नियम ठेवतो मनाचे हट्ट करतो,शरीराचे हट्ट करतो,हे सतगुरु हेच साहेब आहे समजण्याचे गुण नाही,हे सतगुरु माया समजण्याचे गुण आहे अशा संतात माया प्रगटली आहे साहेब प्रगटला नाही हे समजा आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात ज्या संतात सतगुरुशी अकबक प्रेम आहे तो संत सतस्वरुप ब्रम्हच आहे हे समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१०७।।

**ओर अंग मन घेरीयाँ ।। नेक ब्होत रहे माँहे ।।**
**ब्रेहे प्रेम सुखराम के ।। हरी मेहर बिन नाँहे ।।१०८।।**

हंसात मनाचा हट्ट करुन मनाने नियम पाळण्याचे स्वभाव मनाला घेरल्याने कमी–जास्त प्राप्त होऊन जातात परंतु विरह प्रेम प्रगटणे हे हरी मेहेर शिवाय येत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१०८।।

**प्रीत लगी ब्याकूळ भये ।। ब्रेहे धाय रही रोय ।।**
**से हंसा सुखराम के ।। तिरतां बार न कोय ।।१०९।।**

हंसात साहेबाकरीता प्रित लागली आहे त्याचे हृदय साहेब प्राप्त करण्याकरीता व्याकुळ बनले आहे अशा व्याकुळ स्थितीत साहेब नाही मिळण्याची हंसात पिडा पडते आणि अशा व्याकुलतेत हंसाला रडू सुध्दा येते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,भवसागरात सहजमध्ये तिरुन जातात ते परत कधी होणकाळाच्या महादु:खात पडत नाही. ।।१०९।।

**सबद पीड़ भारी घणी ।। मोपे सही न जाय ।।**
**तन फाटे सुखराम के ।। मन धूजे ऊर माय ।।११०।।**

ज्या हंसाला सतशब्द म्हणजे साहेब न मिळाल्याची पिडा खूप भारी राहते त्या पिडेने शरीर फाटत राहते आणि मन साहेबाशी धुजत राहते,घाबरत राहते अशाच हंसाला साहेब मिळतो. ।।११०।।

**दोय कहे ज्हाँ भ्रम हे ।। अेक कहे ज्हाँ भूल ।।**
**दोनू सत सुखराम के ।। अेक कहे वे सूल ।।१११।।**

कोणी दोन सांगतो आहे तेथे भ्रम आहे आणि एक सांगतात ते ही भुललेले आहेत हे दोन्ही सत्य आहे परंतु एक सांगतो ते चांगले आहे(दोन म्हणजे माया आणि ब्रम्ह आणि एक म्हणजे ब्रम्ह).।।१११।।


**मन मानी ज्हाँ थिर भयो ।। तहाँ ही पदवी जाण ।।**
**सुर नर बिच सुखराम के ।। मन सुख एक बखाण ।।११२।।**

हंसाला मन आहे तसेच शरीर आहे हंसाला आधीपासूनच सुख पाहिजे आहे आणि दु:ख मागुनही नको पाहिजे मनाची पोहच मायेपर्यंत असते मायेच्या पलिकडे सतस्वरुपात मन जात नाही हंसाचे मन सुखामध्ये दु:ख पकडू शकतो तसेच दु:खात सुख पकडू शकतो असा याचा मूळ स्वभाव आहे.जेथे मन स्थिर राहते तेथे तो हंस मनाचे सुख मानून राहीला असे जाणा जेथे तो स्थिर आहे तेव्हा समजा तो हंस मनाच्या दु:खात आहे अशाप्रकारे हंस मानव देहात राहो किंवा देवतांच्या देहात राहो तेथे हंस मनाने स्थिर होऊन गेला तर तो हंस मनाने सुखी आहे असे जाणा.।।११२।।

**सुरपुर,नरपुर नागपुर ।। तन दु:ख मिटे न कोय ।।**
**मन सुखतो सुखराम के ।। ज्हाँ समझ्यो ताँही होय ।।११३।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

अशा प्रकारे – सुरपुर – देवलोक  नरपुर = मनुष्य लोक  नागपुर = पाताळ लोक असे तीन लोक तसेच भूर, भूवर, स्वर, महर, जन, तप, सत, तळ,अतळ,वितळ,सुतळ, तळातळ,रसातळ,महातळ असे १४ भवनात हंस जेथे ही मनाने स्थिर आहे तर समजा




हंसाला मनाचे सुख येऊन राहीले आहे परंतु देवलोकात राहील, मृत्युलोकात राहील किंवा पाताळ लोकात राहील शरीराचे दु:ख दु:खच राहते मनाने त्या शरीराच्या दु:खाला कितीही सुख मानून घेतले तरीही ते दु:ख सुख बनत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।११३।।

**भावे मानो ग्यान सूं ।। भावे पदवी पाय ।।**
**मन सुख तो सुखराम के ।। दोनू सरस कहाय ।।११४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हे मनाचे सुख ज्ञानाने माना किंवा पदवी प्राप्त केल्याने येवो दोन्ही प्रकारचे मन सुख तर चांगलेच आहे.

१)ज्ञानाचे मानणे–जसे राजापद मिळाले होते परंतु काही कारणाने चालले गेले तर दु:खी न होता हंसाचे मन हे समजून घेते की प्रारब्धात इतक्याच दिवसाचा राज्य होता हे ही नाही मिळाले असते तर काय केले असते?असे पदवी गेल्यावर दु:खी न होता ज्ञानाने समजून या दु:खात सुख मानून घेतो.

२)पदवीचे सुख–आतापर्यंत मी रंक बनून मायेचे दु:ख भोगत होतो आणि तो कोणत्या योगाने राजा बनून गेला आता मायेचे सुख प्रगट रुपात मन घेतो असे पदवीचे सुख भोगतो असे हे ज्ञानाने समजण्याचे सुख तसेच पदवी प्राप्त झाल्यानंतर प्रगट रुपाने सुख हे दोन्ही ही सुख हंस घेतो हे चांगलेच आहेत. ।।११४।।

**तन दु:ख जां दिन जावसी ।। ताँ दिन धरे न देह ।।**
**निरंजण लग सुखराम के ।। भुक्ते सब नर अेह ।।११५।।**

परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात भले जीव सुरपुरात राहो नरपूरात राहो किंवा नागपूरात राहो त्याच्या शरीराला सुख मिळाले तरच हंस सुखी राहील. त्याला दु:ख मिळाले तर कितीही मनाने माना त्याच्या शरीराचे दु:खणे दु:खणेच राहील ते दु:खणे सुख नाही बनणार उदा.पायाच्या सांध्यावर भाला लागला आहे. भाल्याच्या मारेचे दु:ख जीवाला भारी होऊन राहीले आहे या दु:खाला हंस मनाने हे मानु शकतो की पुढच्याचा मला मारण्याचा बदला असेल तो मारुन चालला गेला आता माझा बदला संपून गेला अशाप्रकारे दु:खात सुख मानून घेतले गेले परंतु शरीराच्या सांध्याला पिडा होऊन राहीली आहे ती मानल्याने संपेल कशी?दु:खच दु:ख बनलेले राहील अशाप्रकारे हंस सुरपुरात राहो किंवा नरपुरात राहो जोपर्यंत त्याला मायेचे शरीर आहे

तोपर्यंत मायेचे दु:ख घ्यावेच लागेल हे दु:ख त्याच दिवशी जाईल ज्या दिवशी तो मायेचे शरीर धारण करणार नाही.हे दु:ख प्रत्येक मनुष्यास होते,प्रत्येक हंसाला होते. भले त्याच्याजवळ निरंजन म्हणजे कर्तारची पदवी राहिली तरीही तो शरीराच्या दु:खातून सुटत नाही हे मायावी शरीर धारण करण्याची रीत हंस अमरलोकात गेल्यावरच सुटते तोपर्यंत शरीराचे दु:ख प्राप्त करण्याची रीत नेहमी बनलेली राहते. ।।११५।।

चौपाई ।।

**ग्यानी सुणो समजणा होई ।। बेक ग्यान सुंई जावे ।।**
**के सुखराम रोग ही खायाँ ।। फेर स्वाद सुंई आवे ।।११६।।**

ज्ञानींनो ऐका,ज्ञानानेच हंस समजवान होतो आणि ज्ञानानेच भ्रमावून जातो जसे कैवल्य विज्ञानाचे ज्ञान ऐकल्यानेही हंस होणकाळ सोडून देतो तसेच मायेचे पाच भोगांचे ज्ञान ऐकल्यानेच हंस मायेच्या पदांशी लीव लावून घेतो आणि काळाच्या मुखात जातो जसे रोग औषधी खाल्ल्यानेच जातो आणि तोच रोग,रोग होणाऱ्या स्वादिष्ट पदार्थ खाल्ल्याने येतो (मधुमेह)हा औषधीने जातो तसेच साखरे सारखी गोड वस्तु खाल्ल्यावर जीवघेणी होऊन जातो.।।११६।।

साखी ।।

**माने संक डर ऊपजे ।। तब लग जाणे दोय ।।**
**के निर्भे सुखराम के ।। अंतर मे भै होय ।।११७।।**

मनात भय उत्पन्न होते,धोका होण्याची शंका उत्पन्न होते तोपर्यंत त्याला ब्रम्हज्ञान आले नाही समजावे कारण की ब्रम्हज्ञान आल्यावर ब्रम्हज्ञानीला सर्वांमध्ये ब्रम्ह ब्रम्ह दिसतो. जसे–ब्रम्हज्ञानी आहे,त्याच्या समोर खुप विषारी साप येऊन गेला असेल तर त्या ब्रम्हज्ञानीला तो साप,साप दिसणारच नाही त्याला तो स्वत:मध्ये जसा ब्रम्ह दिसतो तसा दिसेल ज्याला मी वेगळा आहे आणि विषारी साप वेगळा आहे असे दिसले म्हणजे त्याला ब्रम्हज्ञान नाही आहे,त्याला मायाज्ञान आहे.मायाज्ञानात माया आणि ब्रम्ह असे असे दोन वेगवेगळे दिसतात.असा ब्रम्हज्ञानी वरतून तर सांगेल मी निर्भय आहे,मी ब्रम्ह आहे,साप पण ब्रम्ह आहे परंतु आत भिती राहिल की या सापाने मला चावून घेतले तर मी मरुन जाईल ब्रम्हज्ञानीची मरणे जन्मणे ही भाषा संपून जाते कारण की ब्रम्हज्ञानी सर्वांमध्ये ब्रम्ह बघतो आणि ब्रम्ह ही माया नाही तर ती उपजेल का?आणि उपजणार नाही तर मरेल का?म्हणून त्याला मरण्याचे भय उपजत नाही मरण्याचे भय मायाज्ञानीला उपजते कारण माया जन्मते आणि मरते अशाप्रकारे मायाज्ञानी आणि ब्रम्हज्ञानीचा फरक राहतो.मायाज्ञान हे इच्छेचे असते ब्रम्हज्ञान हे कर्तार ब्रम्हचे असते. ।।११७।।

**दु:ख सुख दोनू ऊपजे ।। सुभ असुभ भी आय ।।**

तब लग सुण सुखराम के ।। मन की संक न जाय ।।११८।।

सुख दु:ख उत्पन्न होते,शुभ तसेच अशुभ समजतो तोपर्यंत त्या साधुला ब्रम्हज्ञान समजले नाही समजा त्या साधुच्या उरात मायाज्ञानच आहे हे समजावे मायाज्ञानामुळे साधुला दु:ख,अशुभ हे त्याच्या मनाला सतावते कर्तार ब्रम्हच्या बीजामध्ये सुख आणि दु:ख दोघे नाही म्हणजे शुभ आणि अशुभ दोघे नाही मायेच्या बीजमध्ये सुख आणि दु:ख दोघे आहेत तसेच शुभ आणि अशुभ हेही दोघे आहेत याचा अर्थ साधु ब्रम्हज्ञानी नाही,मायाज्ञानी आहे म्हणून त्याच्या मनातील भय जात नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।११८।।

मान बड़ाई चाय हे ।। तब लग संक न जाय ।।

सुर नर सब सुखराम के ।। पडदो कर के खाय ।।११९।।

ब्रम्हज्ञानीला मान सन्मान राहत नाही कारण त्याला जगात सर्व मनुष्य मात्रांमध्ये,पशु-पक्ष्या मध्ये,देवी-देवतांमध्ये पारब्रम्ह दिसतो म्हणून मी तु ही समज राहतच नाही मान सन्मान मी तु ही समज राहील्यावरच येते ही समज मी तु ची म्हणजे दोष समजण्याची जगाच्या स्त्री-पुरुषां मध्ये तसेच देवतांमध्ये असते जगाचे स्त्री-पुरुष तसेच देवता हे माया आहे ते ब्रम्हज्ञानी नाही जो ब्रम्हज्ञानी मान-सन्मान चाहतो,वरतुन मान-सन्मानाची इच्छा आहे तर समजावे हा ब्रम्हज्ञानी खोटा ब्रम्हज्ञानी आहे तो मायाज्ञानी आहे आणि ब्रम्हज्ञानाच्या नावावर निच कर्म करुन राहिला आहे.।।११९।।

ब्रम्ह ग्यान नही ऊपजे ।। तब लग संक न जाय ।।

भावे सो सुखराम के ।। बुध बळी नर कवाय ।।१२०।।

जोपर्यंत ब्रम्हज्ञान म्हणजे सर्वांमध्ये ब्रम्ह आहे हे साधुला उपजत नाही तोपर्यंत माया आणि ब्रम्ह एक आहे त्याची ही शंका जात नाही.तो बुध्दीच्या बळावर गोष्टींमध्ये स्वत:ला बनवत राहील तसेच जगाला बनवत राहील परंतु त्या साधकाच्या उरात भाव ब्रम्ह आणि माया असे दोन राहतीलच. ।।१२०।।

संक भागी सांसो मिटयो ।। चाय गई सब ऊँठ ।।

तां नर कूं सुखराम के ।। तीन लोक मे छूट ।।१२१।।

असा ब्रम्हज्ञानी ज्याला माया आणि ब्रम्ह वेगळे दिसतात तसेच शुभ-अशुभ,सुख आणि दु:ख याची फिकीर राहते तसेच मान-सन्मान तसेच मायेच्या सुखांची इच्छा राहते अशा ब्रम्हज्ञानी ब्रम्हला कर्म लागत नाही असे समजून निचकर्म करतात ते निचकर्म त्या साधकाला लागतात हे कर्म पुढे यमद्वारात भोगावे लागते त्याचे हे कर्म माफ केले जात नाही.जो खरा ब्रम्हज्ञानी आहे ज्याला विष आणि अमृत सारखे दिसते म्हणजे विषातही ब्रम्ह आहे आणि अमृतातही ब्रम्ह आहे,शुभ मध्ये ही ब्रम्ह आहे,अशुभ

मध्येही ब्रम्ह आहे मानातही ब्रम्ह आहे आणि अपमानातही ब्रम्ह आहे अशा ब्रम्हज्ञानीला उंच कर्मात ही ब्रम्ह दिसतो तसेच निच कर्मातही ब्रम्ह दिसतो अशा ब्रम्हज्ञानीने ३ लोक १४ भवनात कोणतेही निचकर्म केले तर त्याला कर्म लागत नाही यामुळे यम भोगवू शकत नाही अशी सुट राहते.।।१२१।।

**सुख चावे दु:ख परहरे ।। तब लग ब्रम्ह गिनान ।।**
**के मुख सुखराम के ।। उर भ्यासो नही आन ।।१२२।।**

सुख चाहत असेल आणि दु:ख होईल अशी कोणती स्थिती येऊ देणे इच्छीत नाही तोपर्यंत साधु मुखाने ब्रम्हज्ञान सांगतो त्याच्या उरात ब्रम्हज्ञान प्रगट झाले नाही समजावे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१२२।।

**भ्रम संग दुबध्या गई ।। चाय संग गई चिंत ।।**
**झूट संग सुखराम के ।। गई बिषे रस मिंत ।।१२३।।**

खरे ब्रम्हज्ञान प्राप्त झालेल्या ब्रम्हज्ञानीला भ्रम राहत नाही त्याला सर्वत्र ब्रम्हच ब्रम्ह दिसतो त्याला माया दिसतच नाही अशाप्रकारे ब्रम्ह तसेच माया असे दोन वेगळे न दिसल्या कारणाने मायेच्या सुखाची इच्छाच संपलेली असते अशी इच्छाच संपल्या असल्या कारणाने कोणत्या प्रकारचे मायेच्या दु:खाची चिंता राहत नाही.माया ही खोटी आहे हे समजून गेल्या कारणाने मायेचे विषय रस ही खोटे दिसतात म्हणून अशा ब्रम्हज्ञानीची विषयरसाची चाहना संपलेली असते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१२३।।

**ग्यान संग गुरू पावियाँ ।। लिव संग निरंजन राम ।।**
**साच संग सुखराम के ।। सऱ्या सकळ बिध काम ।।१२४।।**

असे गुरु ज्यांचा भ्रम गेला आहे काळाचे भय गेले आहे,विषय वासना गेली आहे यांच्या संगाने हरचे ज्ञान प्राप्त होते त्या ज्ञानाच्या बळाने घटातच निरंजन राम म्हणजे सतस्वरुप रामजीशी लिव लागते तसेच हंसाला हर प्राप्तीचा अनुभव येऊन जातो असे झाल्यावर दुविधा भाव म्हणजे माया काय आणि ब्रम्ह काय हे समाप्त होऊन जाते अशाप्रकारे त्याला फक्त ब्रम्हच आहे असा विश्वास येऊन जातो मग परमात्मा जाणण्याचे कोणते काम त्याचे बाकी राहत नाही. ।।१२४।।

**ग्यान ज्हाँ तो दूज हे ।। फेर जाप लग जाण ।।**
**अेक नही सुखराम के ।। पचे तहाँ लग आण ।।१२५।।**

जो साधु ज्ञानात ब्रम्हची भक्ती करायला पाहिजे तसेच सोबत मायेचे ही जाप करायला पाहिजे असे दोन प्रकारचे उपदेश देतो तेथे एक हर नाही असे समजावे तेथे हर आणि माया दोन आहे असे जाणावे असा साधु किती ही पचला तरी ही त्याला एक हर


मिळणार नाही तसेच त्याचे शिष्य कितीही पचले तरी ही त्यांना एक हर काय आहे हे समजणार नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१२५।।

**सुख दु:ख अेई भोगवे ।। सर्ग नर्क अेई जाय ।।**
**ब्रम्ह अेक सुखराम के ।। यू सुण दोय क्वाय ।।१२६।।**

स्वर्ग तसेच नर्क येथे जीव सुख आणि दु:ख भोगतो त्याला एक ब्रम्ह निराळा आहे असे सांगतो अशाप्रकारे माया तसेच ब्रम्हच्या दोन वेगवेगळ्या भक्त्या करु लागतो.तो नर ब्रम्हज्ञानी नाही असे जाणा म्हणजे सुख भोगण्याकरीता मायेचे जप करु लागतो तसेच ब्रम्हला प्राप्त करण्याकरीता ब्रम्हज्ञान मनाने समजायला लावतो तो ब्रम्हज्ञानी नाही.।।१२६।।

चौपाई ।।

**सर्ग नर्क कहे नर कहाँ हे ।। सोझ बतावो मोई ।।**
**के सुखराम भूल हे सारी ।। ब्रम्ह बिना नही कोई ।।१२७।।**




आदि सतगुरु सुखरामजी महाराज स्वयम् कथित ब्रम्हज्ञानी विचारतो की स्वर्ग,नरक कोठे आहे ते सांगा ते ब्रम्हपासून वेगळे आहे की नाही ते सांगा तेव्हा आदि सतगुरु सुखरामजी महाराज त्या मनुष्याला सांगितले स्वर्ग,नरक ब्रम्हपासून वेगळे आहे ही तुझी भुल आहे स्वर्ग नरक हे सर्व ब्रम्हमध्ये आहे.।।१२७।।

**कहोजी नर्क देख कुण आयो ।। सुर्ग गम किण आणी ।।**
**के सुखराम मोख कुण दिठी ।। सो मुज कहो बखाणी ।।१२८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांशी स्वयम कथित ब्रम्हज्ञानी मनुष्य विचारतो की, स्वर्ग तसेच नरक कोण पाहून आले?त्यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी त्याला विचारले की,मोक्ष कोण पाहून आला ते मला सांगा. ।।१२८।।

**वां सुण नर्क दु:ख सो कहीये ।। फेर गर्भ गत जाणो ।।**
**के सुखराम सुरग या सुख हे ।। पदवी मोख बखाणो ।।१२९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज स्वयम् कथित ब्रम्हज्ञानीला सांगतात की,स्वर्ग आणि नरक या मृत्युलोकात कसे आहेत हे समज,गर्भात राहणे हे नर्काचे दु:ख आहे आणि जगात मायेचे सुख घेणे हे स्वर्गाचे सुख आहे भ्रम मिटून जाणे ब्रम्हा,विष्णू,महेश पासून मिळणाऱ्या मायेच्या सुखांची इच्छा मिटून जाणे,विषयरस मिटून जाणे आणि हरमध्ये मस्त राहणे हे मृत्युलोकात हंसाला मोक्ष पदवी प्राप्त झाली असे समज असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।१२९।।

**तीन जुगा मे प्रगट जातां ।। भूप सुर्ग नित भाया ।।**

**के सुखराम नर्क गत सेदेहे ।। नास्केत ले आया ।।१३०।।**

आता कलीयुग चालु आहे याच्या आधी सतयुग,त्रेतायुग तसेच द्वापारयुगात राजा लोक स्वर्गात नेहमी प्रगट जात येत होते १८०० वर्ष आधी विक्रमराजा स्वर्गात जात येत होता अशाचप्रकारे नर्क हा नासिकेतूने सदेह जाऊन पाहिला होता ही गोष्ट सर्व जगातील ज्ञानी,ध्यानी जाणतात. ।।१३०।।

**प्रम मोख गम खंड पिंड मांही ।। साध संत गम जाणे ।।**
**के सुखराम तिथंकर पूगा ।। फेर ग्रभ नही आणे ।।१३१।।**

जसे स्वर्गात नर्कात जाता येत होते तसेच सतगुरु संतापासून कैवल्य विज्ञानाचा भेद जाणून तिर्थंकर मोक्षाला गेले आहे त्यांनी परममोक्षाचा रस्ता पिंडात प्राप्त केला होता पिंडातच खंड ब्रम्हंड बनवून ते खंड ब्रम्हांडाच्या पलिकडे गेले होते अशी ३लोकांमध्ये सर्व साधु संत तसेच देवता,तिर्थंकर मोक्षाला पोहचले ही साक्ष भरतात त्यानंतर ते कधीही गर्भात आले नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१३१।।

**सर्ग नर्क प्रगट जग माही ।। बिना ग्यान नही जाणे ।।**
**के सुखराम हाक दे अणभे ।। चोड़े बरण बखाणे ।।१३२।।**

अरे मनुष्य,तु व्यर्थ स्वर्ग,नर्कावर वाद करुन राहीला आहेस तुला ज्ञान नाही म्हणून स्वर्ग तसेच नर्क जगात प्रगट आहे हे समजत नाही.मी तुला अनुभवाची गोष्ट सर्वांना समजावे असे खोलून खोलून वर्णन करुन बोलून राहिलो आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगून राहिले आहे.।।१३२।।

**बूझ्याँ गरज सरे नही भाया ।। सुण्या सांभळयाँ काँई ।।**
**के सुखराम कणकणी पकडयाँ ।। सबे बस व्हे आई ।।१३३।।**

स्वर्ग आहे कां,नर्क आहे कां,मन वशमध्ये होऊन जाते काय? पाच इंद्रिय वश होऊन जातात का हे मला वारंवार विचारल्याने तसेच माझ्याने ऐकल्याने तुझा स्वर्ग आहे किंवा नाही,नर्क आहे किंवा नाही हा भ्रम जाणार नाही मी जे सांगतो त्याचा भेद ताणून पकडल्याने तुलाही मी सांगतो आहे हा अनुभव होऊन जाईल मग सर्व तुझे प्रश्न सहज सुटून जातील असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहेत. ।।१३३।।

साखी ।।

**कोट जतन लख जापता ।। पाँच बस नही होय ।।**
**लिव लागाँ सुखराम के ।। सेझाँ सब बस जोय ।।१३४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज मनुष्याला सांगतात पाचींना वश करण्यात कोटी प्रकारचे प्रयत्न केले तसेच लक्ष प्रकारचे जाप्ते केले तरी ही पाची वासनिक इंद्रिये वशमध्ये येत नाही ते तर सतसाहेबाशी लीव लागताच सहजमध्ये वश होऊन जातात.

।।१३४।।

**आठ पोहर चोसट घड़ी ।। लिव जे झोल न खाय ।।**
**तो सेझाँ सुखराम के ।। पांच तीन बंध जाय ।।१३५।।**

ज्या संतांची आठप्रहर तसेच चौसष्ट घडी साहेबाशी लीव लागली राहते त्या लीवमध्ये थोडीही ढिल पडत नाही अशा संताचे पाच-शब्द,स्पर्श,रुप,रस,गंधाच्या वासनेत तसेच तीन गुण-रज,सत,तम च्या वासना सहज वश मध्ये होऊन जातात. ।।१३५।।

**लिव बिन पकडे ग्यान सूं ।। पाच तीन कूं कोय ।।**
**वाँ नर के सुखराम के ।। पलक पोहोर बस होय ।।१३६।।**

जो मनुष्य परमात्म्याच्या लीव शिवाय शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध अशा पाच वासनांना ज्ञानाने पकडण्याचा प्रयत्न करेल तर त्या पुरुषाने क्षणभरापासून जास्तीत जास्त पोहोर म्हणजे ३ तासापर्यंत वश करु शकेल जास्त वेळे करीता किंवा नेहमी करीता ज्ञानाने वश करु शकणार नाही.।।१३६।।

**लिव सूं आपै बंध गया ।। पाच तीन मिल एक ।।**
**वे जिरे हुवा सुखराम के ।। आठ पोर मध देख ।।१३७।।**

परंतु ज्या साधुला साहेबाशी लीव लागली आहे त्याची पाची विषय वासना,तीन गुणाची वासना तसेच मन हे सर्व नेहमी करीता पक्के वश होऊन जातात हे कसे? परमात्मा म्हणजे सतशब्द,सतशब्द मायेमध्ये रामनामात राहतो हे रामनाम सतगुरुच्या द्वारा येत्या श्वासात तसेच जात्या श्वासात रटल्याने परमात्म्याचा सतशब्द हंसात प्रगट होतो पुढे धारोधार स्मरण केल्याने ६ पूर्वेचे तसेच ६ पश्चिमेचे कमळ छेदन होतात. जेव्हा चौथे कमळ म्हणजे नाभी कमळ जेथे विष्णु-लक्ष्मी विराजमान आहे हे कमळ छेदन होते तेव्हा हंसाच्या पाची आत्मा शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध हंसापासून वेगळे होऊन जातात यामुळे हंस पाची आत्म्यांच्या वासनेपासून मुक्त होऊन जातो जसे हंस नवव्या स्थानावर जातो म्हणजे त्रिगुटीत जातो तेथे हंसाचे मन हंसापासून वेगळे होऊन जाते अशाप्रकारे हंस मनापासूनही मुक्त होऊन जातो.हंसात ने:अक्षर प्रगट होताच इच्छा म्हणजे त्रिगुणी माया ढीली होऊन जाते जेव्हा हंस दहाव्या द्वारी पोहचतो तेव्हा त्रिगुणी माया पूर्ण संपून जाते. अशाप्रकारे परमात्म्याशी लीव बंध साधुची स्थिती बनते हा माझा अनुभव आहे तो मी तुला बजावून ताणून-ताणून सांगून राहिलो आहे दुसरे कोटी उपाय केले तरी ही मन पाच विषय वासना तसेच तीन गुण वासना हे वश होत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहेत. ।।१३७।।

।। इति ब्रम्ह ग्यानी को अंग संपूरण ।।